## प्रकरण - दुसरे

## छत्रपती कालीन सरदार पाटणकर घराणे

**प्रस्तावना :-**

देशाचे, राज्यांचे, राजघराण्यांचे इतिहास जसा लिहिला जातो, तसाच इतिहास राजपुरूषांचा, कर्तबगार व्यक्तींचा आणि कर्तबगार घराण्यांचा लिहिला गेला आहे. ज्याला आपण मराठयांचा इतिहास म्हणतो, अगर मराठेशाहीचा इतिहास म्हणतो, त्याचा प्रारंभ ढोबळमानाने शिवछत्रपतींच्या स्वराज्यनिर्मितीच्या कार्यापासून होतो. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य इस्लामी आक्रमकांकडून नष्ट झाल्यानंतर महाराष्ट्राच्या भूमीवरील जवळजवळ ३०० वर्षानंतर शिवछत्रपतींच्या रूपाने स्वराज्यनिर्मिती घडून आली. हा कालखंड केवळ राजकीय गुलामगिरीचा नव्हता तर तो मानसिक गुलामगिरीचा, त्यांच्या सत्वहीन जीवनपध्दतीचा एक निदर्शक होता.

१७ व्या शतकाच्या सुरूवातीला अनेक मराठा घराण्यांचा उदय झाला. त्यामध्ये 'भोसले' घराणे हे प्रमुख होते. या घराण्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक मराठा सरदारांना एकत्र करून मराठा स्वराज्याची निर्मिती केली. परंतु हा प्रयत्न पहिल्यांदा नव्हता, तर शहाजी राजे यांनी इ.स. १६३२च्या सुमारास स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रयत्नाच्या अपयशामुळे समस्त मराठी समाज एकत्र येणे गरजेचे आहे, याची जाणीव समाजातील सुज्ञ लोकांना झाली.

इ.स. १६३२ ते इ.स. १६३६ या कालखंडात स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न शहाजीराजे यांच्याकडून केला गेला.[१] या युध्दात अनेक शूरवीर रणांगणात आणि राजकारणात तरबेज बनले त्यात सरदार पाटणकर घराण्यातील पुरूषही होते.[२] आपले एक बलिष्ठ राज्य आपण इतर कुणाची ही मदत न घेता उभारता येऊ शकते हा विश्वास शहाजीराजांनी

मराठयांच्यात निर्माण केला. त्यामुळेच ‘अरू उत्तर दछन रछन को इत। साहजु है उत साहिजहॉ।। याचा अर्थ असा की, उत्तरेकडील प्रदेशाचे रक्षण करण्यास शहाजहॉ आणि दक्षिणेचे रक्षण करण्यास शहाजी आहे, असे म्हटले जायचे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीत चांदजीराव, नागोजीराव, यशवंतराव इत्यादी पाटणकर वीरांनी पराक्रमाची शर्थच केली होती. त्यांचा गौरव प्रत्यक्ष छत्रपतींनी केला होता.

शहाजहान याने अहमदनगरचे राज्य घेतले. परंतु शहाजी राजांमुळे मोगलांना त्या प्रांताचा वसूल सुरळित मिळेना. तेव्हा शहाजहान बादशहाने इ.स. १६३५ यावर्षी विजापूरच्या सुलतानावर स्वारी करण्याचा बेत केला. त्याने प्रथम विजापूरच्या दरबारी वकील पाठवून त्याच्या मार्फत निरोप दिला की, विजापूरच्या दरबाराने शहाजीचा पक्ष सोडावा. अहमदनगरच्या राज्यातील घेतलेले सर्व किल्ले परत दयावेत म्हणजे सोलापूर किल्ला तुमच्याकडे राहून तुमची पूर्वीची राज्यसीमा कायम करू. परिंडयाहून नेलेली ‘मलिक—इ—मैदान’ तोफ परत द्यावी.[३] परंतु विजापूर सुलतानाला ही गोष्ट मान्य झाली नाही. तेव्हा दिल्लीच्या बादशहाने मोठे सैन्य जमवून शहाजीराजे व विजापूरच्या सुलतानावर पाठविले. मोगल सरदार खान दौरानने विजापूरी मुलखात शिरून त्याने नलदुर्ग, सोलापूर वगैरे प्रांत घेऊन कोल्हापूर व मिरज यांचे आसपास छावणी देऊन राहिला.[४] विजापूरच्या सुलतानानेही सैन्याची जुळवाजुळव केली. त्यावेळी सरदार पाटणकर घराण्यातील बहिरजीराव व त्याचे पुत्र हिरोजीराव पाटणकर यांच्या पुढे मोठा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी मोगली सैन्याशी लढण्यासाठी बहिरजीराव याने विजापूरच्या सैन्यात जावे व हिरोजीरावांनी रामोशी लोकांच्या मदतीने पाटण महालाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करावा.[५]

शिवछत्रपतींची स्वराज्य निर्मिती मागील भूमिका ज्यांनी स्वीकारली, त्यांनी शिवछत्रपतींना मनोमन साथ दिली. अशी साथ देणारी

जी काही मोजकी घराणी महाराष्ट्रात होती, त्यापैकी एक कोयना खोऱ्यातील साळुंखे ऊर्फ पाटणकर घराणे होय. शिवपूर्वकाळात महाराष्ट्रातील देशमुख घराण्यांना समाजात मोठी प्रतिष्ठा होती. देशमुख हा परगण्यातील सर्वात मोठा वतनदार समजला जाई. परगण्याचा जणू तो राजा म्हणूनच राहत असे. स्वत:चे वाडे, स्वत:चे सैन्य बाळगून आपल्या परगण्यात राजासारखा तो वावरत असे. शेजारच्या परगण्यातील देशमुख मंडळीशी त्यांचे संघर्ष चालू असत. अनेकदा सुलतानाची सत्ताही तो जुमानत नसे. अशा या देशमुख वतनदारांच्या प्रदेशात शिवाजी महाराजांना स्वराज्याचा प्रयोग यशस्वी करावयाचा होता. त्यासाठी साम—दाम—दंड—भेद अशी नीती त्यांनी अवलंबिली.

इ.स. १६५९साली झालेल्या अफझलखान वधानंतर शिवाजी महाराजांनी वाई—प्रतापगडापासून कोल्हापूर—पन्हाळयापर्यंतचा प्रदेश स्वराज्यात सामील करून घेतला, त्यावेळीच कोयना आणि केरा खोरे व तेथील वतनदार पाटणकर देशमुख स्वराज्यात रूजू झाले, तथापि, आपणांस या काळातील सरदार पाटणकर घराण्यासंदर्भातील कागदपत्रे मिळत नाहीत. शिवाजी महाराजांनी सरदार पाटणकर यांना लिहिलेले इ.स. १६७८चे एकमेव पत्र उपलब्ध आहे. त्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी काढलेल्या दक्षिण द्विग्विजय मोहिमेमध्ये यशवंतराव, बाळाजीराव आणि चांदजीराव पाटणकर या सरदार पाटणकर घराण्यातील कर्तबगार व्यक्तींनी सहभाग घेतला होता.[६] या पैकी यशवंतराव हे युध्दात मारले गेले. तेव्हा श्री राज्याभिषेक शक ४, पिंगल नाम संवत्सर, माघ शुध्द द्वादशी, गुरूवासर (दि. २४ जानेवारी, १६७८) रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी बाळाजीराव व चांदजीराव पाटणकर यांना सांत्वनपर पत्र लिहिले. या पत्रात ते म्हणतात, '......श्रीराजा शिव छत्रपति याणी बालाजीराऊ व चांदजीराऊ पाा पाटण यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही पत्र पाटविले ते पावले कितेक आपले वर्तमान ताा जे लिहिले ते कलो आले. ऐसियास तुम्ही मानाचे धणी वतनी लोक आहा.....'.[७] या मजकुरावरून

पाटणकर यांना स्वराज्य काळात वतनदार देशमुख म्हणून मोठी प्रतिष्ठा होती हे लक्षात येते.

या पत्रात छत्रपती शिवाजी महाराज पुढे म्हणतात, '...... झगडीयात येसवंतराऊ पडला तरी त्याची आयुष्य मर्यादाच तितकी त्यास काय करावे तुम्ही त्याचे मुलांचा समाचार घेत जाणे. त्यांचे जित्रब त्याचे मुलास करार करून पूर्वीच पत्रे पाठविली आहे ती व रा आनाजी पंतापासी असतील समाचार घेऊनू त्याप्रमाणे चालवणे आपले समाधान असो........'.[८] या सांत्वनपर पत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना यशवंतराव पाटणकर यांच्या मुलाविषयी जी तळमळ होती ही दिसून येते. त्यांना भविष्यात कोणत्याही समस्या येऊ नयेत म्हणून त्यांना पूर्वीची इनामे कायम करण्यात आलेली दिसून येतात. या लढाईत यशवंतराव पाटणकर धारातीर्थी पडले. परंतु, ही लढाई केव्हा, कुठे किंवा कुणाशी झाली, हे समजून येत नाही. पण ज्या अर्थी छत्रपती शिवाजी महाराजांनी आस्थेने सांत्वनपर पत्र पाठवले आहे, त्या अर्थी ही लढाई स्वराज्य रक्षणासाठी अथवा कर्नाटक मोहिमेतील स्वराज्यवृध्दीसाठी घडून आली असावी, असा आपण तर्क करू शकतो. एखादा एकनिष्ठ वतनदार स्वराज्याच्या सेवेत खर्ची पडला असता, छत्रपती शिवाजी महाराज त्यांच्या आप्तांची व कुटुंबियांची कशी काळजी घेत होते, हेही दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील सरदार पाटणकर घराण्याची अस्सल कागदपत्रे उपलब्ध नाहीत. जर ती उपलब्ध झाली तर मराठयांच्या इतिहासात फार मोलाची भर पडणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या निघृण हत्येनंतर महाराष्ट्रात उद्‌भवलेल्या अभुतपूर्व परिस्थितीवर प्रकाश टाकणारी बरीच अस्सल कागदपत्रे आज आपल्याकडे उपलब्ध आहेत. मराठा इतिहासाच्या दृष्टीनेही पत्रे महत्त्वपूर्ण आहेत.

छत्रपती संभाजी महाराजांच्या निघृण हत्येनंतर किंबहुना मराठयांच्या राजाला ठार केल्यानंतर आता मराठेशाही बुडाली, असे औरंगजेबाला वाटत होते. यावेळी छत्रपती संभाजी महाराजांची पत्नी महाराणी येसूबाई व राजपुत्र शाहू आणि राजाराम महाराज व त्यांचे कुटूंबीय हे रायगडावर होते. मराठा राजकुटुंबास कैद केले की आपली दक्षिणेची सर्व मोहिमच फत्ते झाली, असे मोगल बादशहाला नव्हे तर त्याच्या सर्व सरदारांना वाटत होते. हीच भावना स्वराज्यातील किल्लेदार, ठाणेदार, हवालदार यांसारख्या अधिकाऱ्यांना व देशमुख—देशपांडे यासारख्या वतनदारांनाच्या मनात निर्माण झाली होती. स्वराज्यातील अन्य गडकोटासही मोगली सैन्यांचे वेढे बसले होते. गडकोटावरील शिबंदी त्यांच्याशी लढत होती, पण मोगलांच्या अफाट सैन्यासमोर शरणागती स्वीकारावी लागत होती. किल्ल्यांपाठोपाठ किल्ले व परगण्यांपाठोपाठ परगणे जिंकत मोगली सैन्य मराठयांच्या राजधानीकडे अर्थात रायगडाकडे कूच करित होते.

अशा परिस्थितीत छत्रपतींच्या कुंटुंबातील सर्वांनीच एकाच गडावर अडकून राहणे धोक्याचे आहे. याची जाणीव महाराणी येसूबाईसह मराठी मुत्सद्दयांना झाली. या खडतर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी अनेक मराठा सरदार व मुत्सद्दी रायगडावर मसलती करत होती. त्यावेळी सरदार चांदजीराव पाटणकर हे सुध्दा रायगडवर हजर होते.[९] संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, मानसिंग मोरे, रूपाजी भोसले, जनार्दनपंत हणमंते, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य, खंडो बल्लाळ चिटणीस वगैरे सरदार व मुत्सद्दी मंडळींनी छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी महाराणी येसूबाईसाहेब याचा विचार घेऊन छत्रपती संभाजी पुत्र शाहू मोठा होईपर्यंत राजारामानीं राज्यकारभार करावा असे ठरविण्यात आले.[१०] अशा निराशेच्या भयाण अंध:कारात महाराणी येसूबाई धीरोदात्तपणे उभ्या राहिल्या. रायगडावर आपल्या पुत्रास बाल शाहूराजास गादीवर बसविण्याचा आग्रह न धरता, वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून त्यांनी राजाराम महाराजांस छत्रपतींच्या

गादीवर प्रतिष्ठित केले. त्यांच्या या कृतीने मराठा समाजासमोर निस्वार्थीपणाचा व स्वराज्याभिमानाचा एक मानदंड निर्माण केला.

छत्रपती राजाराम महाराजांनी रायगडाबाहेर पडून, फिरते राहून, शत्रूशी मुकाबला करावा आणि प्रसंगी जिवास धोका निर्माण झाल्यास कर्नाटकात दूर जिंजी किल्ल्याकडे निसटून जावे. तेथे नुतन राजधानी वसवून राज्यकारभार करावा, अशी योजना आखली. छत्रपती राजाराम महाराज आपल्या साथीदारासह योजनेबरहुकूम प्रतापगड, सातारा, वसंतगड असा प्रवास करीत शेवटी पन्हाळगडावर आले.[११] त्यांच्यासोबत या वेळी संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडो बल्लाळ चिटणीस, रूपाजी भोसले, रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी प्रतिनिधी, शंकराजी नारायण सचिव इत्यादी मातब्बर सेनानी, सरकारकून व सरदार होते.[१२] मराठा सरदारांच्या पराक्रमामुळे राजाराम महाराज जिंजीस सुखरूप पोहचले. जिंजीस पोहचल्यावर छत्रपती राजाराम महाराज यांना तक्ताधिपती म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळांची घोषणा केली व प्रधानांच्या वगैरे नेमणुका करून सर्व मराठे सरदारांना मानाचे पोषाख, इनामें व जहागिरी वगैरे दिल्या.[१३]

स्वराज्यातील जे जे वतनदार लोक शत्रूस सामील झाले होते, त्यांच्यावर सरदार नागोजीराव आणि त्यांचे पुत्र चांदजीराव पाटणकर यांनी पाटणपासून जावळीपर्यंतच्या प्रदेशात स्वाऱ्या करून त्यांनी स्वराज्यद्रोह्यांना शिक्षा केल्या आणि त्या प्रदेशात छत्रपतींच्या वतीने स्वराज्याचा अंमल पुन्हा प्रस्थापित केला. सरदार पाटणकरांच्या या कामगिरीचा मजकूर छत्रपती राजाराम महाराजांना कळविला. छत्रपती राजाराम महाराजांनी सरदार पाटणकरांच्या कामगिरीवर संतुष्ट होऊन त्यांना श्री राज्याभिषेक शक १६, शुक्ल नाम संवत्सर, अश्विन शुध्द नवमी, गुरूवासर (दि. १२ सप्टेंबर, १६८९) रोजी त्यांच्या कार्याचा गौरव करणारे एक आज्ञापत्र पाठविले. या आज्ञापत्रात छत्रपती राजाराम महाराज म्हणतात, '.....तुम्ही हुशार खबरदार राहुनू फिसाहतखोरास

कोटगा देऊन मार्ग मामला अनुकुल चालता केला यावरून स्वामी तुम्हावरी संतोशी जाले. तरी तुम्ही मर्दाने लोक तैसेच आहा तुमचे भरवसेच आहेत हे मऱ्हाटे लोकी इनामासी खता न करीता मऱ्हाठेधर्माची इरे धरून स्वामी कार्य करावे. यैसे इकडून तुम्हा लोकांचे उर्जितच आहे....'.[१४] या आज्ञापत्रातील आशयावरून असे दिसून येते की, छत्रपती राजाराम महाराजांना सरदार पाटणकर यांच्यावर किती विश्वास होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या अनेक पत्रांत 'महाराष्ट्रधर्म' हा शब्द आलेला आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या महाराष्ट्रधर्माची शिकवण दिलेली होती. तो 'महाराष्ट्रधर्म' सर्वात जास्त याच वेळी धोक्यात आला होता. 'स्वराज्यरक्षण' हे महाराष्ट्र धर्माचे प्रमुख लक्षण होते, आणि सरदार पाटणकर या 'महाराष्ट्रधर्मास' जागत होते.

छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत सरदार पाटणकर घराण्याचा मोठया प्रमाणात उदय व विस्तार झालेला दिसून येतो. श्री राज्याभिषेक शके १६, शुक्ल नाम संवत्सर, अश्विन शुध्द एकादशी, मंदवासर (दि.१५ सप्टेंबर, १६८९) मधील एका पत्राद्वारे छत्रपती राजाराम महाराज सरदार नागोजीराव पाटणकर यांना आदेश देतात की, '........अैसीजे जाऊली प्रांतीचे लोक फिसाहतीस मिळोन चंदरराऊ यासि पारास होउनू येऊन हरामखोरी मांडिली आहे. दरेकर व मालसरे व नऱ्हे आदीकरून वरकड त्याला मिलाले आहेत. यैसियासि स्वामिने या लोकांचे बहुत रवेशीने चालविले.....'.[१५] पत्रातील विषयानुसार जावळी प्रांतातील दरेकर, मालुसरे, नऱ्हे आदी वतनदार लोक फितुर होऊन शत्रूस मिळाल्याचा व त्यांचा मोड करण्याचा आदेश छत्रपती राजाराम महाराज सरदार नागोजीराव पाटणकर यांना देतात. छत्रपती संभाजी महाराजांच्या निघृण हत्येनंतर अशी परिस्थिती निर्माण झाली की बऱ्याच मातब्बर वतनदारांच्या मनात स्वराज्याविषयीची निष्ठा कमी झालेली दिसून येते.

आज्ञापत्रात पुढे छत्रपती राजाराम महाराज म्हणतात, '.....जे स्वामीचे पायासि दुर्बधीने राहू करितील त्याचे अणुमात्र बरे होणार

नाही. त्या मजुरांचा काय हिसाब आहे. या उपरी त्याला मारून काढावे.....'.[१६] स्वराज्याला इजा पोहचविणाऱ्या अनेक मराठा सरदारांना त्यांच्या या अगळिकेची शिक्षा करावी आणि परत सर्वत्र छत्रपतींचा अंमल प्रस्थापित करावा. '.......याकरिता जमेतीनसी राजश्री धनाजी जाधव सेनापंचसहश्री यासि त्या प्रांते रवाना केले आहेत व या बराबरी आणिखीही जमेत सरदार दिल्हे आहेत......'.[१७] या मजकुरांवरून तत्कालिन राजकीय, सामाजिक परिस्थिती समजून घेण्यास मदत होते. जहागिरीच्या लालसेने अनेक मराठा सरदार स्वकियांना त्रास देत होते. अशा बंडखोर मराठा सरदारांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे, हे ओळखून छत्रपती राजाराम महाराजांनी राजश्री धनाजी जाधव यांना मोहिमेसाठी पाठविले व त्याचबरोबर सरदार पाटणकरांनी त्यांना मदत करावी अशी आज्ञा केलेली होती.

छत्रपती राजाराम महाराज पुढे आज्ञापत्रात असे म्हणतात की, '.....स्वामीने बहुत संतोषी होऊन भरवसा मानिला की तुम्हासारिखे लोक त्या प्रांते असता स्वामीकार्य होऊन यावया काये अशक्य आहे. जमाव राखून जैसी कस्त करायची तैसी केली यावरून स्वामीस बहूतच मजुरा जाला. तरी या गोस्टीचे अपूर्व काये आहे. तुम्ही लोक तैसेच आहात. हाली हा गनिम मारून काढावा आणि तो प्रांत मोकळा करावा याहून आणिक काये विशेष आहे. जाऊली प्रांत मोकला केल्याने बहुतच मामला अनकूल होतो.....हे तुम्ही शहाणे लोक जाणतच आहा'[१८], आज्ञापत्रातील आशयावरून असे दिसून येते की, सरदार पाटणकर यांचे महत्त्व तसेच जावली प्रांत स्वराज्याच्या दृष्टीने किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित होते. सरदार पाटणकरांचे छत्रपतींनी वेळोवेळी कौतुक केले आहे. शूर स्वामीनिष्ठ पाटणकरांच्याकडून असा पराक्रम, अशी सेवा घडणार नाही, तर मग अन्य कुणाकडून घडेल, असे हे छत्रपती राजाराम महाराजांकडून कौतुक आहे.

याच आज्ञापत्रात छत्रपती राजाराम महाराज असे म्हणतात की, '.....हे राज्य श्रींच्या वरदांचे आहे. यांचे कोण्हाच्याने अनिष्ट होवतच नाही. तुम्ही लोकी या प्रसंगी कस्त करून गनिम नेस्तनाबूद करावा आणि मामला सुरलित होये ते करावे....'.[१९] याचाच अर्थ हे राज्य छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठया कष्टाने उभे केले आहे आणि याला अपाय करण्याचा काही लोक प्रयत्न करीत आहेत. परंतु या प्रसंगी तुम्ही या लोकांना पराभूत करून परत छत्रपतींचा अंमल बसवावा आणि त्यासाठी तुम्हांस जे योग्य वाटते ते तुम्ही करावे, असे स्पष्टपणे नमूद करतात. थोडक्यात या राज्याचे अनिष्ट कोणाकडून ही होणार नाही, ही मोठी आत्मविश्वासाची भावना त्या ठिकाणी व्यक्त झालेली दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराज आणि त्यांचे सरदार प्राणपणाने मोगली शत्रूशी लढत होते. परंतु शत्रूंच्या प्रचंड फौजेसमोर मराठयांचे किल्ले व ठाणी टिकाव धरू शकत नव्हती. पन्हाळगडाला शत्रूंनी वेढा दिला होता. हा वेढा किल्ल्याभोवती आवळला जाण्यापूर्वीच तेथून निसटणे आवश्यक होते. तेव्हा छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत योजनेबरहुकूम कर्नाटकात जिंजीकडे जाण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे महाराजांनी काही निवडक साथीदारांसोबत दिनांक २६ सप्टेंबर, १६८९ रोजी पन्हाळगड गुप्तपणे सोडला.[२०] छत्रपती राजाराम महाराजांचा हा कर्नाटकाचा प्रवास अत्यंत नियोजनबध्द आणि गुप्ततेने झाला. ठिकठिकाणी असलेली शत्रूची ठाणी चुकवित वेषांतर करून छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या रोखाने आपला प्रवास चालू ठेवला.

या प्रवासात असतानाच वाटेतच श्री राज्याभिषेक शक १६, शुक्लनाम संवत्सर, अश्विन बहुल एकादशी, रविवासर (दिनांक २९ सप्टेंबर, १६८९) रोजी छत्रपती राजाराम महाराज सरदार नागोजीराव पाटणकर व सरदार चांदजीराव पाटणकर यांना एक महत्त्वाचे पत्र पाठवितात. यामध्ये त्यांनी

म्हटले आहे की, सुमुहूर्त पाहून छत्रपती राजाराम महाराज स्वारीवर निघाले आहेत, तसेच महाराष्ट्रातील स्वराज्याचा कारभार त्यांनी रामचंद्र पंत अमात्य यांच्यावर सोपविला असून ते जसे तुम्हास लिहितील अगर सांगतील त्याप्रमाणे वर्तणूक करावी. '.......स्वामी सुमुहूर्ते करून स्वार होउनू स्वारीस गेले यैसी यास कितेक हरामखोरास नतीजा द्यावयास या प्रांतीचा कारबाराचा मख्तीयार राजश्री रामचंद्र पंडित सचिव यावरी देउनू ठेविले असती यैसियास स्वामी कार्याविशई तुम्हास लिहितील व सांगतील. त्याणे प्रमाण वर्तणूक करीत जाणे.....'.[२१] थोडक्यात राजश्री रामचंद्र पंडित अमात्यांकडे सर्व स्वराज्याची सुत्रे देण्यात आलेली आहेत. त्यांनी सांगितलेले कार्य सरदार पाटणकर यांच्याकडून व्हावेत, अशी इच्छा छत्रपती राजाराम महाराज व्यक्त करतात.

पुढे ते असे लिहितात, '.....तुम्ही स्वामीचे पुरातन सेवक असा व या राज्याची पोटतिडीक तुम्हा लोकास आहे. जे गोस्टीने राज्य संरक्षण होये तोच पदार्थ करणे. म्हणजे स्वामी तुम्हावरी संतोषी होतील......'.[२२] यावरून स्वराज्याप्रती असलेली छत्रपती राजाराम महाराजांची धडपड दिसून येते. ती अशी की, स्वराज्य जे छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक अडचणींवर मात करून उभारले होते. ते अशा अडचणींच्या प्रसंगी शत्रूच्या ताब्यात जाता कामा नये. त्यासाठी सर्वांनी एकत्र येवून लढा उभारला पाहिजे व मनामध्ये कोणतीही अभिलाषा न बाळगता स्वराज्याच्या पाठीशी ठाम उभे राहिले पाहिजे तसेच स्वराज्यरक्षणाच्या कामी सरदार पाटणकर यांच्याविषयी त्यांना किती विश्वास वाटत होता, हे ही दिसून येते. पुढे सरदार पाटणकरांनी आपल्या बहाद्दुरीने व पराक्रमाने महाराजांचा हा विश्वास उचित होता, हेच सिध्द केलेले दिसून येते. अतिशय संकटमय व धोकादायक प्रवासातही छत्रपती महाराजांचे स्वराज्यरक्षणाच्या कार्याकडे कसे व किती लक्ष होते, याचे दर्शन या पत्राद्वारे आपल्याला मिळते.

छत्रपती राजाराम महाराज विविध संकटे पार करीत नोव्हेंबर, १६८९ मध्ये जिंजीस पोहचले होते. स्वराज्यात मोगलांनी अनेक गडकोट, ठाणी जिंकून घेतली होती. राजधानीचा रायगड किल्ला झुल्फिकारखानाने जिंकून घेऊन महाराणी येसूबाईसाहेब व शाहू महाराज यांना कैद केले होते. हा वृत्तांत छत्रपती राजाराम महाराजांना समजला तेव्हा त्यांना दु:ख झाले. या दु:खात मराठयांना दिलासा देणारी एकच गोष्ट होती, ती म्हणजे सर्व राजपरिवार मोगलांचे कैदी न बनता छत्रपती राजाराम महाराज मोगलांच्या हाती तुरी देऊन कर्नाटकात निसटून गेले होते आणि त्यांनी जिंजी किल्ल्यात नूतन राजधानी थाटून राज्यकारभार सुरू केला होता.

छत्रपती राजाराम महाराजांनी महाराष्ट्रातील स्वराज्याचा कारभार राजश्री रामचंद्रपंत अमात्य, राजश्री संताजी घोरपडे आणि राजश्री धनाजी जाधव यांच्यावर सोपविला होता.[२३] राजश्री रामचंद्रपंत अमात्य हे राज्याचा मुलकी कारभार पाहत होते तर राजश्री संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधव हे राज्याची लष्करी आघाडी सांभाळत होते. या उभय सेनानींच्या लष्करी मोहिमांमध्ये सरदार नागोजीराव पाटणकर व सरदार चांदजीराव पाटणकर आपल्या सैन्यासह सहभागी झाले होते.[२४] ठिकठिकाणी शत्रूशी लढाया करून त्यांना जेरीस आणित होते.

मराठयांचे छत्रपती राजाराम महाराज हे महाराष्ट्रातून कर्नाटकात गेल्याचे समजताच औरंगजेब बादशहाने आपली कोरेगावची छावणी उठविली[२५] आणि तो कर्नाटकात विजापूरला येऊन तेथे छावणी करून राहू लागला.[२६] महाराष्ट्र आणि कर्नाटक अशा दोन्ही प्रदेशातील आपल्या सैन्याच्या हालचालीवर नजर ठेवता यावी हा त्याचा उद्देश होता. या दरम्यान जिंजी मुक्कामी असणाऱ्या छत्रपती राजाराम महाराजांनी चांदजीराव पाटणकर यांना श्री राज्याभिषेक शक १६, प्रमोद नाम संवत्सर, अधिक वैशाख शुध्द पौर्णिमा, रविवासर (दि. १३ एप्रिल, १६९०) मध्ये पत्र पाठवून राजश्री संताजी घोरपडे

व राजश्री धनाजी जाधव यांना मदत करण्याची आज्ञा केली होती. त्या आज्ञेत ते म्हणतात, ‘......यैसीजे स्वामी कर्नाटक प्रांत आलीया उपरी मागे तुम्ही त्या प्रांते राहोन रा संताजी घोरपडे व रा धनाजी जाधव उभयंता पंचसहस्त्री या समागमे स्वारी सिकारी करून स्वामी कार्ये केले हे वर्तमान स्वामीस श्रुत जाले त्यावरून तुमचा बहुतच मजुरा जाहला.....’.[२७] तुम्ही छत्रपती राजाराम महाराज कर्नाटक प्रांतात म्हणजेच जिंजीस असताना राजश्री संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधव यांना मदत करून जे शौर्य गाजविले याचा वृत्तांत छत्रपती राजाराम महाराजांकडे पोहचला होता.

पुढे ते म्हणतात, ‘......प्रस्तुत स्वामी कर्नाटक प्रांते आले याकरिता अवरंगशाहा त्या प्रांतीहून निघोन विज्यापूरास आला आहे. जमाव थोडका आहे. यैशा प्रसंगी रा संताजी घोरपडे व रा धनाजी जाधव व तुम्ही आवघे सरदार मिळोन पोखता जमावाने विज्यापुरावरी जावे देश मारून तलफ करावा फावल्या प्रसंगी शहरावरीही छापा घालावा अवरंगशाहास दहशत लावावी यैसा प्रसंग आहे......’.[२८] म्हणजेच यातून सरदार पाटणकर घराण्याचे महत्त्व अधोरेखित होते. सरसेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यासोबत तुम्ही जाऊन मोगल बादशहा औरंगजेब यांच्या सैन्यामध्ये दहशत निर्माण करून विजापूरच्या आसपासच्या शहरावरती छापा मारून तेथील लूट पुढे लष्करी कारवायांसाठी वापरावी. ‘......याकरिता रा संताजी घोरपडे व रा धनाजी जाधव या उभेयतास पत्रे पाठविली आहेत. तेणेप्रमाणे ते जमावानिशी विज्यापूर प्रांती स्वारीस जातील. तुम्हीही त्या बराबरी आपल्या जमावाने जाणे. आणि त्या उभयताच्या मते स्वारी शिकारी करून गनिमास दहशत लाऊन काबूत सापडलिया मारून गर्देस मेलवणे. कुल लस्कर येकवट होऊन खासा विज्यापुरावरीच छापा घालून औरंगशाहा नेस्तनाबूद होयेस करणे आणिक संतोश वार्ता स्वामीस लेहून पाठवणे....’.[२९] या पत्रामधून जिंजीमधील छत्रपती राजाराम महाराज यांची स्वराज्याविषयीची तळमळ दिसून येते. तसेच मराठी मुलूखापासून

दूर असूनही राज्यकारभार कसा करावा, याचा आदर्श आपल्याला छत्रपती राजाराम महाराज यांच्या कृतीतून दिसून येतो.

पुढे याच पत्रात जिंजीकडील परिस्थिती सांगताना ते म्हणतात, '......खासा मनुश्य साहा सात हजार घोडा व वीस हजार हशम इतकियाचा खावंद याला आपले करून घेऊन ते व रा शाहाजीराऊ याकडील चार पाच हजार घोडा तैसाच आपल्या कडील जमाव व सिलेदार सात आठ हजार आहे इतकियाची फौजा तियावरी पाठविली आहे आणखीही जमाव येतच आहे थोडिकिया दिवसात इकडील गनीम मारून नाहीसा करून स्वामी तिकडे येतील......'.[३०] छत्रपती राजाराम महाराजांकडे जिंजी किल्ल्यात ६—७ हजार घोडदळ आणि २० हजार पायदळ इतके सैन्य जमले होते. शिवाय तंजावरकर राजे शहाजी महाराज यांच्याकडून ४—५ हजार घोडदळ आलेले होते, अशी माहिती या पत्रातून मिळते. तसेच इकडील शत्रूस परास्त करून आपण लवकरच स्वराज्यात परत येऊ, असा आत्मविश्वास छत्रपती राजाराम महाराजांकडे असल्याचे दिसून येतो. छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या जवळील सरदारांचा योग्य उपयोग करून घेतलेला दिसून येतो. त्यांच्या कार्यक्षमतेला मोठया प्रमाणात वाव दिलेला दिसून येतो.

पुढे ते म्हणतात, '.....या प्रसंगी स्वामीने तुम्हा लोकांचे भरोसे धरले आहे.....'.[३१] इतका जबरदस्त विश्वास छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या सरदारांवर दाखविल्यामुळे खऱ्या अर्थाने स्वराज्य हे स्वतंत्र राहिले. बलाढय मोगल बादशहास पुढे मराठेशाही जिंकता आलेली नाही. सरदार पाटणकर घराण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे या पत्रात राजश्री चांदजीराव पाटणकरांचा उल्लेख 'सेना पंचसहस्त्री' असा केलेला आहे.[३२] सरदार पाटणकरांनी जी उल्लेखनीय सेवा व स्वराज्यरक्षणाची कामगिरी केली त्याबद्दल छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांना सेनेमधील सेनापतीच्या खालोखाल असणारे हे पद बहाल केलेले दिसून येते.

सुरू सन ईहिदे तिसैन अलफे, रमजान छ १३ (दि. ९ जून, १६९०) व्याघ्रगड प्रांताचे सुभेदार त्रिंबक कृष्ण सभासद यांनी पाटण परगण्याचे हवालदार रामजी अनंत यांना पत्र लिहिले होते. त्या पत्रात त्यांनी सरदार नागोजीराव व चांदजीराव पाटणकर यांच्या शौर्याची माहिती दिली व त्यांना १२ गावे इनाम देण्याचे ठरविलेले दिसून येते. त्यांनी पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात, '.....नागोजीराऊ व चांदजीराऊ पाटणकर देसाई पाा माा हे वतनदार घराणेचे लोक. यावरी राा स्वामी कृपाळू होऊन सेव सेनापचसहश्री सांगितले आहे.....'.[३३] वरील पत्रातील मजकूरावरून सरदार नागोजीराव पाटणकर व सरदार चांदजीराव पाटणकर या पितापुत्रांनी छत्रपती महाराजांशी इमाने इतबारे एकनिष्ठ राहून सेवा केली म्हणून महाराजांनी त्यांना सेनेची पंचसहस्त्री दिल्याचे दिसून येते.

सरदार पाटणकर घराण्याने आपल्या पराक्रमाच्या जोरावर अनेक शत्रूस पराभूत केले होते. हे पुढील मजकूरांवरून कळून येते. '.....पाटणकरांनी गनिमाच्या फौजा मारून गर्देसी मलविले. पाटणकरांनी जमाव केला त्यासी सौदागराचे कर्जे घेतली व आपली हिसात तमाम जमावाचे भरीस घालून मामला राखोन राज्य रक्षावियाची माहिती केली.....'.[३४] या वतनदार पाटणकरांनी सौदागरांची (व्यापारी) कर्जे काढून सैन्य उभा केले आणि त्या सैन्यानिशी शत्रूशी लढून शत्रूस पराभूत केल्याचेही म्हटले आहे. '.....माा देसाई पाटणकर यासी बकसीस द्यावे यैसे तह केला होता त्यासी देसाई माानुले याणी या पंत राजाज्ञा यासी विनंती केली की आपण आजीवरी मशागती केली की आपले उर्जित जाले पाहिजे.......'.[३५] सरदार पाटणकर यांनी स्वराज्य रक्षण करण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन स्वराज्याचे हुकूमतपन्हा असलेले राजश्री रामचंद्रपंत अमात्य यांनी बक्षिस देण्याचे ठरविले. '.......म्हणऊन पाटणकर यांनी राा पंत राजाज्ञा यासी देहाये बारा दिल्हे......'.[३६] तेव्हा सरदार पाटणकर यांना छत्रपतींच्या वतीने १२ गावांचे इनाम देण्यात आले. ती गावे पुढीलप्रमाणे, मौजे करले, मौजे पिपलासी, मौजे चपनाली, मौजे

मेडोसी, मौजे म्हावसी, मौजे म्हावसर, मौजे तांबलाणे, मौजे मणदुरे, मौजे गोकुळ निा दस कुलकर्णी, मौजे रासाटी, मौजे बिबवी आणि मौजे दिवसी खुर्द.[३७] थोडक्यात, सरदार पाटणकर यांच्या सेवेबद्दल राजश्री रामचंद्रपंत अमात्य यांनी त्यांना छत्रपतींच्या वतीने १२ गावांची इनामाची सनद बहाल केली. जावळी–प्रतापगड–वाई–सातारा–कराड–पाटण–शिराळा असे सरदार पाटणकरांच्या लष्करी हालचालींचे कार्यक्षेत्र होते.[३८]

वर उल्लेख केलेली इनामाची व सरंजामाची सनद खुद्द छत्रपती राजाराम महाराजांच्या जिंजी दरबाराकडून मिळावी, अशी इच्छा सरदार नागोजीराव व सरदार चांदजीराव पाटणकर यांनी पत्राद्वारे जिंजीतील महाराजांचे मुख्य सल्लागार प्रल्हाद निराजी प्रतिनिधी यांना केली असता त्यांनी सु।। ईहिदे तिसैन अलफ, मोहरम छ १२ (दिनांक ५ ऑक्टोबर, १६९०) च्या पत्रान्वये उभय पाटणकर पितापुत्रांना असे कळविले की, राजश्री रामचंद्रपंत अमात्य यांनी दिलेल्या सनदा या जिंजी दरबारातून छत्रपतींनीच दिलेल्या सनदा आहेत असे समजावे. कारण महाराष्ट्रातील कारभाराची सर्व मदार राजश्री रामचंद्रपंत अमात्य यांच्यावर सोपविली गेली आहे. तेव्हा '......येथून सनद पाठवणे न लगे......'.[३९]

अशाच आशयाचे एक पत्र सरदार नागोजीराव पाटणकरांना मुख्य प्रधान नीळकंठ मोरेश्वर यांनी इ.स. १६९० मध्ये पाठविल्याचे दिसून येते. त्या पत्रात मुख्य प्रधानांनी सरदार पाटणकरांच्या स्वामीकार्याची स्तुती करताना म्हटले आहे की, '......त्या प्रांते तुम्ही राजश्रींच्या पायाशी रूजू राहोनू साहेबकामे बहूत केली. त्यावरून तुम्हावरी संतोषी आहेत. राजश्रींची कृपा बहूत तुमचे ठाई आहे. तुम्ही तैसेच एकनिष्ठतेने राहाणी केली राजश्री तुमचे बरे करतील याहून बहुताप्रकारे चालवितील तुम्ही समाधान असो दिलहे पाहिजे.....'.[४०] यावरून सरदार नागोजीराव व सरदार चांदजीराव

पाटणकर या पितापुत्रांनी केलेल्या स्वराज्यसेवेबद्दल व स्वामीसेवेबद्दल छत्रपती राजाराम महाराजांसह सर्व मराठामंडळ अत्यंत समाधानी आणि खुश होते.

छत्रपती राजाराम महाराज जिंजी मुक्कामी असताना ते सतत स्वराज्यातील प्रमुख मराठा सरदार यांच्या संपर्कात होते. वेळोवेळी त्यांना स्वामीकार्याची आठवण करून देत. स्वराज्याचे हुकूमतपन्हा राजश्री रामचंद्र पंत अमात्य हे स्वराज्यात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडींचा वृत्तांत छत्रपती राजाराम महाराजांना पाठवित असत. सरदार चांदजीराव पाटणकरांनी केलेल्या कामगिरीवर खुश होवून छत्रपती राजाराम महाराज यांनी त्यांना एक हत्ती भेट दिला होता. परंतु या व्यवहाराची फारशी कल्पना नसल्यामुळे राजश्री रामचंद्रपंत अमात्य यांनी हा हत्ती कोणा शिंदे नावाच्या सरदाराला द्यावा असे पत्र सरदार चांदजीराव पाटणकरांना पाठविले. तेव्हा सरदार चांदजीराव पाटणकर यांनी राजश्री रामचंद्रपंत अमात्यांना कळविले की, हा हत्ती स्वामींनी आम्हांस दिला आहे. तेव्हा तो बक्षीस म्हणून आमच्याकडे सनद पाठवावी, म्हणजे आमच्याकडील हत्तीण शिंद्यांकडे पाठवू. यावर राजश्री रामचंद्रपंत अमात्य यांनी पत्र लिहून कळविले की, '.....तुम्ही स्वामी कार्यावरी बहुत येकनिष्टेने कष्ट मेहनत केली. या करिता तो हत्ती तुम्हास व बकसीस दिल्हा आहे. तो घेणे आणि हतीण सिद्यास देविली आहे ते देणे....'.[४१] वरवर विचार करता हे हत्ती प्रकरण साधे सरळ असले तरी सरदार पाटणकरांना मराठयांच्या दरबारात मोठा मानमरातब असल्याचे आपणांस पहावयास मिळते. आपल्या अंगभूत शौर्याच्या जोरावर ते प्रत्येक मोहिमेत सहभागी होऊन शत्रूस नामोहरण करत होते. तेव्हा त्यांच्या पराक्रमाची कदर करण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांकडून वेळोवेळी बक्षिसे देण्यात आली होती.

सरदार चांदजीराव पाटणकर यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आणि आपल्या स्वभाव गुणांमुळे आपल्या प्रांतातील अनेकांना सैन्यामध्ये सहभागी करून घेतले होते. प्रत्येक व्यक्तीच्या कर्तृत्वाला

कार्याची जोड देऊन त्यांच्याकडून स्वराज्यकार्य करून घेतले होते. त्यामुळे सरदार चांदजीराव पाटणकर हे सेनापंचसहश्री या हुद्दयापर्यंत पोहचले होते. लष्करी कारवाया जलद गतीने करण्यासाठी त्यांच्याजवळ घोडदळ असूनही त्यांना पागेची पंचसहश्री मिळाली नव्हती. तेव्हा सरदार चांदजीराव पाटणकर यांनी छत्रपती राजाराम महाराजांना विनंती केलेली आढळून येते. तेव्हा छत्रपती राजाराम महाराजांच्या ही गोष्ट लक्षात आली तेव्हा त्यांनी श्री राज्याभिषेक शक १९, अंगिरा नाम संवत्सर, भाद्रपद शुध्द पंचमी, इंदुवासर (दिनांक ५ सप्टेंबर, १६९२) मध्ये पत्र लिहून सरदार चांदजीराव पाटणकर यांचा मुलगा रामराव पाटणकर यांना पागेची पंचसहश्री प्रदान केली.

त्याबाबतचा मजकुर पुढीलप्रमाणे, '......रामराव पाटणकर यास सिलेदारांची पंचसहश्री आहे. त्यास पागेचे पंचसहश्रीची सनद करून पाठविली....'.[४२] या पागेची व्यवस्था करण्यासाठी ते सुचना करताना लिहितात, '.....सिलेदारीची घोडी रामराव पागेस देतील. रामराव याच्या पथकात खटपटे मनुश जिवाजी गंगाधर त्या प्राा उमेदवार आहे स्वामीकार्याचे खटपटे मनुश त्याची आसामी सभासदत घाळून खटपटेस दिल्हे पाहिजे.....'.[४३] यावरून छत्रपती राजाराम महाराज यांना प्रत्येकाच्या कार्याची उंची व व्याप्ती याचे सखोल ज्ञान होते, हे दिसून येते. पुढे जिवाजी गंगाधर याच्या वेतनासंदर्भात ते लिहितात, '.....जिवाजी गंगाधर याची आसामी सभासदत घाळून वतन सालिना ७०० सातसे करून मानीलेचे ......'.[४४]

मोगल बादशहा औरंगजेब याला संपूर्ण मराठी सत्ता काबीज करावयाची होती. त्यानुसार रायगड जिंकून घेणाऱ्या झुल्फिकारखानाला जिंजी काबीज करण्यासाठी नेमणूक करतात. जिंजी हा किल्ला तीन किल्ल्यांनी मिळून बनलेला मजबूत किल्ला होता. भविष्यात एखादे मोठे संकट स्वराज्यावर चालून आले तर या किल्ल्याचा राजधानी म्हणून उपयोग व्हावा, असा दूरदृष्टीपणा छत्रपती शिवाजी महाराजांनी जाणून या किल्ल्याची मजबुती केली

होती. किल्ल्याच्या अभेद्यपणामुळे व छत्रपती राजाराम महाराजांनी तो लढविण्याच्या केलेल्या तयारीमुळे झुल्फिकारखानाने वेढा घालून ही काबीज करणे अशक्य झाले. तेव्हा बादशहाने खानाच्या मदतीसाठी आपला वजीर असदखान व धाकटा पुत्र शहजादा कामबक्ष या दोघांना सोबत मोठी फौज, युध्दसाहित्य व खजिना देवून जिंजीच्या पायथ्याशी पाठविले.[४५] बादशहाकडून एवढी मोठी कुमक आल्यावर झुल्फिकारखानाने मोठया उत्साहाने जिंजीचा वेढा चालवून किल्ल्यावर प्रखर हल्ले करण्यास सुरूवात केलेली दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या मुत्सद्‌देगिरीच्या जोरावर खान पितापुत्र आणि शहजादा यांच्याशी स्वतंत्रपणे अंतस्थ संबंध प्रस्थापित केले. या संबंधाच्या जोरावर मोगली सैन्यास एकमेकांच्या विरोधात उभे केले.[४६] अशा प्रकारचे राजनैतिक डावपेच चालू असताना छत्रपती राजाराम महाराजांनी राजश्री संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधव यांना ससैन्य येऊन जिंजीचा मोगली वेढा उठविण्याची आज्ञापत्रे पाठविली.[४७] छत्रपतींच्या हुकूमानुसार या उभय सेनानींनी आपापली सैन्य घेऊन कर्नाटकात कूच केले होते. या मराठी सैन्यात सरदार चांदजीराव पाटणकर सेनापंचसहस्त्री आपल्या सैन्यासह हजर होते.[४८]

हे मराठी सैन्य तुंगभद्रा नदीपर्यंत येऊन पोहोचल्याची बातमी छत्रपती राजाराम महाराज यांना कळताच त्यांनी सरदार चांदजीराव पाटणकर यांना जिंजीच्या पायथ्याशी येण्याविषयी खास पत्र श्री राज्याभिषेक शक १९, अंगिरा नाम संवत्सर, कार्तिक बहुल चतुर्दशी, मंदवासर (दिनांक २६ नोव्हेंबर, १६९२) मध्ये पाठविले होते. या पत्रात छत्रपती राजाराम महाराज म्हणतात की, '.....राजश्री संताजी घोरपडे सेनापती फौजेनसी चंदीस येत आहेत. तुंगभद्रा तीरास आले. त्या बराबरी तुम्हीही आपल्या जमावानिशी येत आहा, म्हणोन हे वर्तमान राजश्री सेनापती याणी लिहिले त्यावरून बहुत संतोषी जाले...... सेनापतीस स्वामीने आज्ञापत्र पाठविले आहे

तरी तुम्ही मानिले समागमे आपल्या जमावानिसी बहुत सिताब स्वार घेऊन लांबलांब मजल करून स्वामीसनिध येणे. तुमचे स्वामीचे भेटीत ते सकल अभिस्ट सिधीस पावतील.....’.[४९]

दिनांक १३ डिसेंबर, १६९२ रोजी राजश्री संताजी घोरपडे यांनी मार्गात कांचीपुरमजवळ अलिमर्दानखान या मोगल सरदाराचा दणदणीत पराभव केला आणि त्यास कैद केले.[५०] त्याच्या सोबत असणाऱ्या खजिन्यासह त्यास त्यांनी जिंजीत राजाराम महाराजांसमोर उभे केले. तर दिनांक १६ डिसेंबर, १६९२ रोजी राजश्री धनाजी जाधव यांनी जिंजीच्या पायथ्याशी वेढा घालून बसलेल्या मोगली सैन्यावर अचानक हल्ला करून मोगलांचा इस्माईलखान मखा नावाचा सरदार पकडला[५१] आणि त्याला घेऊन ते छत्रपती राजाराम महाराजांसमोर गेले. अशाप्रकारे मराठयांच्या या दोन महान सेनानींनी कर्नाटकात मोगलांचे दोन जबरदस्त पराभव करून जिंजीपुढील त्यांचा वेढा उठविला. खऱ्या अर्थाने मराठयांच्या स्वातंञ्ययुध्दातील हा एक महान विजय होता.

सरदार चांदजीराव पाटणकर हे राजश्री संताजी घोरपडे यांच्या सैन्यात होते. या सैन्याने कांचीपुरमजवळ अलीमर्दानखानाचा पराभव केला. त्यामध्ये सरदार चांदजीराव पाटणकर यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या या योगदानाबद्दल खुद्द छत्रपती राजाराम महाराजांनी श्री राज्याभिषेक शक १९, अंगिरा नाम संवत्सर, माघ बहुल पंचमी, भौमवासर (दिनांक १४ फेब्रुवारी, १६९३) रोजी पाटण परगण्यातील १२ गावांच्या पूर्वीच्या इनामासह संपूर्ण पाटण परगण्याच्या इनामाची सनद दिली होती. या सनदेत सरदार चांदजीराव पाटणकर यांच्या कामगिरीची नोंद घेतलेली दिसून येते. छत्रपती राजाराम महाराज या सनदेत म्हणतात, ‘.......तुम्ही स्वामीचे पुरातन सेवक. सेवा बहूत एकनिष्ठेने केली आहे. तुम्ही जमाव घेवुन राजश्री संताजी घोरपडे सेनापती समागमे कर्नाटकात आलेत. येवुन स्वामीसेवा केली. यावरून स्वामी तुम्हावरी बहुत

संतोषी होवुन तुम्हावरी कृपाळू होऊन.......परगणे पाटण महाल सारा ईनाम.... दिल्हा असे......'.[५२] सरदार पाटणकरांना पूर्वी पाटण परगण्यातील १२ गावे इनाम होती. आता छत्रपती राजाराम महाराज सरदार चांदजीराव पाटणकरांच्या पराक्रमावर इतके संतुष्ट झाले की त्यांनी संपूर्ण पाटण महालच इनाम देऊन त्यांचा गौरव केला.

छत्रपती राजाराम महाराजांनी संपूर्ण पाटण परगण्याची (पाटण महालाची) इनामाची सनद सरदार चांदजीराव पाटणकरांना दिली. या सनदीचा उतारा ताम्रपत्रावर देण्यात आला. तो पुढीलप्रमाणे,

'स्वस्तीश्री राज्याभिषेक–शके १९ अंगिरानाम संवत्सरे माघ बहुल पंचमी भौमवासरे क्षत्रिय–कुलावंतस श्री राजाराम छत्रपती यांनी चांदजीराउ बिन नागोजीराव पाटणकर देशमुख परगणे पाटण यांस दिल्हे वृत्तिपत्र ऐसें जें. तुम्ही स्वामीचे पुरातन सेवक, सेवा बहुत येकनिष्ठेने केली आहे, व तुम्ही जमाव घेऊन कर्नाटकांत राजश्री संताजी घोरपडे सेनापति या समागमें येऊन सेवा करीत आहा यास्तव स्वामी तुम्हावरी बहुत संतोषी होऊन तुम्हावरी स्वामी कृपाळु होऊन तुम्हांस इनाम पुर्वी परगणे पाटणाखाले गांव ११ अकरा व मौजे अडूळ परगणे कराड देह १, येकुन १२ गांव चालत आहेत त्या देखील परगणे पाटण माहाल सारा ईनाम, कुलबाब, कुलकानु हल्लीपट्टी, पेस्तर पट्टी, झाडाझाडोरा पडिलेपानासहिंत, खेरीज हक्कदार व ईनामदार करून माहाल ईनाम दिल्हा असे. तुम्ही माहाल आपले स्वाधीन करून घेऊन लेकराचे लेकरी इनाम अनभवुन सुखरूप असणें. या वृत्तिस भोसला होऊन ईस्कील करील तो भोसल्याचे वंशीचा नव्हे, यासी आणीक कोणी अन्यथा करील त्यास धर्मशास्त्राचे वचन

।स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधरां।।

।षष्ठि – वर्ष – सहस्त्राणि विष्टयां जायते कृमि:।१ ।।

हे पातक जाणोन तुम्हास इनाम चालवीतील, तुम्ही देसमुखिची सेंवा करून सुखे असणें. जाणिजे निर्देश समक्ष. मुद्रा मयि देयं विराजते.[५३]

सरदार चांदजीराव पाटणकर हे इतर मराठा सैन्यासह वर्षभर जिंजीत राहिलेले दिसतात. कारण याच कालखंडात त्यांनी आपले पाटणकर घराण्यातील भाऊबंद राजश्री पदाजीराव पाटणकर यांच्या नावाची पागेच्या पंचसहस्त्री पदासाठी शिफारस केलेली आहे. राजश्री पदाजीराव पाटणकर यांना मराठी सैन्यात 'सहस्त्री' पदाचा मान होता. त्यांनी महाराष्ट्रात मोगली फौजांशी लढताना लक्षणीय कामगिरी बजावली होती. या कामगिरीची दखल घेऊन छत्रपती राजाराम महाराजांनी राजश्री पदाजीराव पाटणकर यांना पागेची पंचसहस्त्री द्यावी, अशी विनंती सरदार चांदजीराव पाटणकर यांनी केल्यावर छत्रपतींनी ती मान्य करून तशी श्री राज्याभिषेक शक १९, अंगिरा नाम संवत्सर, फाल्गुण, शुध्द अष्टमी, रविवासर (दि. ५ मार्च, १६९३) रोजी राजश्री पदाजीराव पाटणकरांना सनदही दिली. या सनदेद्वारे महाराजांनी राजश्री पदाजीराव पाटणकर यांना सालिना २००० होनांचा सरंजामही बहाल केलेला दिसून येतो.

या सनदेत छत्रपती म्हणतात की, '.......पदाजीराऊ पाटणकर याणी स्वामीच्या पायासी येकनिष्टता धरून देशामधे स्वामी सेवा येक भावे करीत आहेत. तरी यासी पूर्वी सहेश्री आहे. त्यासी पागेची पंचसहश्री सागा यासि आज्ञा केली पाहीजे म्हणौन विनंति केली. त्यावरून स्वामी कृपाळू होऊनू पागेची पंचसहश्री सांगीतली असे. पागेचा जमाव करून राजेश्री चांदजीराऊ पाटणकर याचे ताबीन राहून स्वामी सेवा करीत जाणे......'.[५४] या सेवेबद्दल सरदार पदाजीराव पाटणकर यांना वार्षिक २००० होन वतन देण्यात आले. त्याबद्दल छत्रपती राजाराम महाराज म्हणतात, '.....एकूण वतन सालीना होनु पादशाही दोन हजारास केले असेती.......'.[५५] '.......पूर्वील सेवेचे फाजील असेल ते हालीहमी वजा करणे व चाकर हाजीर

तेरीखे पासून वतन घेत जाणे.....’.[५६] सदर वतनामध्ये तुम्ही तुमचा व तुमच्या सेवेत असणाऱ्या लोकांचा खर्च भागविणे. जर पूर्वीच्या सेवेतील एखादा मुजोर, फाजील, कर्तव्यात कसूर केलेल्या सेवकांस सेवेतून कमी करणे व त्याबदलात नवीन चाकरीस ठेवून त्यास वतनात सामावून घेणे.

पाटण परगण्याच्या इनामाबद्दल व इतर सरंजामाविषयी छत्रपती राजाराम महाराज यांनी राजश्री रामचंद्र पंत अमात्यांना आज्ञा केली की, सरदार चांदजीराव पाटणकर यांच्या सेवेबद्दल दिलेले पाटण परगण्याचे इनाम व इतर सरंजाम हे कायमस्वरूपी करण्यात यावे. याबद्दल श्री राज्याभिषेक शक १९, श्रीमुख नाम संवत्सर, वैशाख शुध्द पंचमी, रविवासर (दिनांक ३० एप्रिल, १६९३) मध्ये जिंजी मुक्कामावरून ते अमात्यांना पत्र पाठविले होते व त्यात असे दिसून येते की, ‘......राजश्री चांदजीराऊ पाटणकर याणी स्वामींची सेवा येकनिष्ठेने आजी पर्यंत केली व पुढेही करीत आहेत.....’.[५७] यावरून असे दिसून येते की, सरदार पाटणकर घराण्यांतील कर्तबगार पुरूषांनी छत्रपती राजाराम महाराजांशी एकनिष्ठ राहून सेवा केलेली दिसून येते. या पत्रांत छत्रपती राजाराम महाराज पुढे म्हणतात, ‘.......यांचे सर्व प्रकारे चालवणे गोमठे करणे हे स्वामीस अगत्य या करीता स्वामीने यांस पाटण माहाल ईनाम करून दिल्हा आहे व आणिखी कितेक सरंजाम करून दिल्हा आहे......’.[५८] यावरून छत्रपती राजाराम महाराजांच्या दरबारी सरदार पाटणकर घराण्यांचे असलेले महत्त्व अधोरेखित होते.

‘.....त्याच्या सनदा निराल्या सादर केल्या आहेत. तेणे प्रमाणे याचे अविछीन चालवीत जाणे.....’.[५९] तत्कालीन परिस्थितीमध्ये छत्रपती घराण्यांशी असलेली सरदार पाटणकर यांची निष्ठा आपल्याला येथे पाहावयास मिळते. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी जहागीर याऐवजी रोख पगार हे सेवेसाठी दिलेली पध्दत परिस्थितीनुसार छत्रपती राजाराम महाराजांनी बदललेली दिसून येते. या सनदेचा उर्वरीत आशय पुढीलप्रमाणे, ‘.....कदाचीतर

राजश्री संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधवराऊ हे यासी कथला करीतील तरी चांदजीराऊ म्हणजे खासा स्वामींचे जानुबातेचे आहेत.....’.[६०] म्हणजेच छत्रपतींशी सरदार पाटणकरांशी असणारे संबंध व सरदार पाटणकरांवरील दृढविश्वास अधोरेखित होताना दिसून येतो.

इ.स. १६९३ या वर्षात मराठयांच्या दृष्टीने एक दु:खाची गोष्ट घडली ती म्हणजे, छत्रपती राजाराम महाराज आणि राजश्री संताजी घोरपडे यांच्यात आलेले वितुष्ट होय. याचे कारण असे घडले की, जिंजीच्या पायथ्याशी राजश्री संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधव यांनी मोगल सेनापती झुल्फिकारखान याच्या सैन्याची दाणादाण उडविल्यानंतर खानाने आपल्या सैन्याच्या सुखरूप माघारीसाठी छत्रपती राजाराम महाराजांकडे याचना केली. छत्रपती महाराजांनी भविष्यातील सोयीसाठी झुल्फिकारखानाची विनंती मान्य केली व त्याला जिंजीपुढून सुखरूपपणे माघार घ्यावयास संमती दिली. ही गोष्ट घोरपडे बंधूंना विशेषत: राजश्री संताजी घोरपडे यांना आवडली नाही. जिंजीपुढे संकटात सापडलेल्या मोगली फौजेचा फडशा मराठयांनी पाडावा म्हणून त्यांनी महाराजांजवळ आग्रह धरला. तो महाराजांनी मान्य केला नाही. हा आपला अपमान झाला, असे राजश्री संताजी घोरपडे यांना वाटून ते जिंजी दरबारातून निघून गेले. छत्रपती महाराजांनी या प्रसंगी कडक धोरण स्वीकारले आणि राजश्री संताजी घोरपडे यांना सेनापतीपदावरून दूर करून त्या पदावर राजश्री धनाजी जाधव यांची नेमणूक मे, १६९३ मध्ये केली.[६१]

छत्रपती राजाराम महाराज यांनी राजश्री संताजी घोरपडे यांच्या सैन्यात असणाऱ्या सरदारांना पत्रे पाठवून त्यांनी राजश्री धनाजी जाधवांच्या सैन्यात सामील व्हावे असे हुकूम पाठविले. राजश्री संताजी घोरपडे यांच्या सैन्यात असलेले सरदार चांदजीराव पाटणकर यांच्या नावे श्री राज्याभिषेक शक १९, श्रीमुख नाम संवत्सर, जेष्ठ शुध्द तृतीया, मंदवासर (दि. २८ मे, १६९३) पाठविलेले आज्ञापत्र पहावयास मिळते. या आज्ञापत्रात

छत्रपती महाराज असे म्हणतात की, '.....संताजी घोरपडे याणी व बहिरजी घोरपडे यांणी स्वामीच्या पायाशी अनवरखी वर्तणूक केली. याकरिता बहिरजी घोरपडे यास राज्यातून बाहेर घातले. संताजीचे सेनापतीपण दूर करून राजश्री धनाजी जाधवराऊ यासी सेनापतीपण सांगितले आहे. तरी तुम्ही रा धनाजी जाधवराऊ सेनापती यांचे ताबीन राहोन स्वामीकार्य करीत जाणे.....'.[६२] मराठयांच्या दृष्टीने छत्रपतींशी सेनापतीचे वितुष्ट येणे ही फार दुख:दायक गोष्ट होती. सरदार चांदजीराव पाटणकर सहित अनेक मराठा सरदार या घटनेने दु:खी झालेले दिसून येतात. थोडया काळात राजश्री संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधव ससैन्य मराठी मुलखात आले. सरदार चांदजीराव पाटणकर हे ही स्वराज्यात आले. स्वराज्याच्या रक्षणासाठी व वृध्दीसाठी उभय सेनानींमध्ये सौहार्द व सहकार्य असणे अत्यंत आवश्यक आहे, हे जाणून सरदार चांदजीराव पाटणकर यांनी उभयतांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला, पण दुर्दैवाने त्यांना यश आले नाही.

तत्कालिन खडतर परिस्थितीमध्ये वतनाच्या लालसेने अनेक मराठा सरदार शत्रूपक्षात दाखल झाले होते. त्यामुळे सरदार पाटणकर घराणे गनिमाला मिळू नये, तसेच मराठा फौजेत जी काही दुही माजली होती. त्यामुळे सर्व सैन्यामध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली होती. ही कोंडी फोडण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी सरदार पाटणकर यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्राचा आशय असा, '......त्या प्रांतीच्या राज्याचा कस्ती फार राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यावरी आहे. ते आज्ञा करीत जातील तैसी वर्तणुक करीत जाणे......'.[६३] जरी छत्रपती राजाराम महाराज स्वराज्यापासून दूर जिंजीला असले तरी स्वराज्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेवर त्यांचे बारकाईने लक्ष्य असलेले दिसून येते. तसेच राजश्री रामचंद्र पंत अमात्य यांच्या आज्ञेनुसार कामकाज करीत जाणे. राजश्री अमात्यांनी ही जबाबदारी सरदार पाटणकर आणि इतर मराठा सरदारांच्या मदतीने यशस्वी पार पाडलेली दिसून येते.

सरदार पाटणकर यांच्या पाटण महालात एकूण ५७ गावे होती. छत्रपती राजाराम महाराजांनी राजश्री त्र्यंबक कृष्णा जे व्याघ्रगड सुभ्याचे सुभेदार होते. त्यांना सुहूर सन आर्बा तिसेन अलफ, छ १ सफर (दिनांक २२ सप्टेंबर, १६९३) रोजी पत्र पाठवून सरदार चांदजीराव पाटणकर यांना पाटण महालातील चौतीस गावे इनाम व मोकाशे देण्याचे आदेश दिलेले दिसून येतात. इनामामध्ये सुरल (सुरूळ), आंबवणे, घाणवी (घाणबी), गोजेगाऊ (गोजेगाव), वांजे, दसदण (दस्तन), गाढवखोप, आबुरले, चिटेघर, नाणेल (ल), चिरंबे, कसबा पाटण, साखरी, मेंडोसी (मेंढोसी), दिवसी खुर्द, चाफोली, विभवी, माऊसी (मावशी), पिपळोसी, ताबकणे (तामकण), केरल (ळ), मणदुरे, गोकुल (ळ), मुलगाऊ (मुळगांव) तर मोकाशेमध्ये काटी, वाजोले (वाझोली), तावकड (तामकडे), देवघर, बेलवडे बु।।, रामोजी इंगले चिखली, शंकरराऊ दिवसी (दिवशी), कटाजी काटे गोशटवाडी (गोष्टवाडी), बेलवडी खुर्द, वाजेगाऊ (वाजेगाव) इ.[६४]

राजश्री रामचंद्रपंत अमात्य व राजश्री परशुराम त्र्यंबक या दोघांनी या उभय सेनानींमध्ये समेट घडवून आणला व तसा छत्रपती राजाराम महाराजांना जिंजी येथे निरोप दिला. या समेटाची वार्ता छत्रपती राजाराम महाराजांना कळताच त्यांना मोठा आनंद झालेला दिसून येतो. या पार्श्वभूमीवर महाराजांनी श्री राज्याभिषेक शक २१, मुळनाम संवत्सर, वैशाख शुध्द द्वादशी, भोमवासर (दि. १७ एप्रिल, १६९४) सरदार चांदजीराव पाटणकर यांना जिंजीहून आज्ञापत्र पाठविले होते. या आज्ञापत्राचा आशय पुढीलप्रमाणे, '......राजश्री रामचंद्रपंती रा परशुरामपंतास सातारीयास पाठविले. त्यांणी येऊन उभयता सरदारांची येक्यता करून दिल्ही आणि वैशाख माहा कारणे कर्नाटकात यावे येसा निर्वाह केला आहे, हे वर्तमान उभयतांनी लिहिले. त्यास हाली त्यास व रा आमात्य पंतास पत्रे पाठविली आहेत की सत्वर फौजा पाठऊन देणे तरी तुम्ही ज्यांचे ताबीन असाल त्यांचे ताबीन राहोन आपल्या जमावानिशी त्याजबराबरी स्वामीसंनिध येऊन गनीम पराभवाते पाववणे.....'.[६५] यावरून असे

दिसते की, छत्रपती राजाराम महाराजांच्या आज्ञेप्रमाणे सरदार पाटणकर यांनी वर्तणुक केली होती. त्यामुळे सरदार पाटणकरावरील छत्रपती राजाराम महाराजांचा विश्वास अधिक दृढ झाला. या आज्ञापत्रानुसार ते जिंजीस ससैन्य गेलेले दिसून येतात.

राजश्री रामचंद्रपंत अमात्यांच्या प्रयत्नास यश आल्यानंतर उभय सेनानींनी कर्नाटकात जिंजीच्या मदतीला जाण्याचा निश्चय केला. त्यांच्याबरोबर सरदार चांदजीराव पाटणकर हे ही आपल्या सैन्यासह कर्नाटकात गेले. स्वराज्यातून वेळोवेळी राजश्री रामचंद्रपंत अमात्यांनी सरदार पाटणकर यांच्या एकनिष्ठेबद्दल तसेच त्यांनी स्वराज्याची केलेली सेवा याबद्दल सर्व माहिती छत्रपती राजाराम महाराज यांना दिलेली होती. सरदार पाटणकर यांच्या सेवेबद्दल छत्रपती राजाराम महाराज यांनी जिंजी मुक्कामी श्री राज्याभिषेक शके २३, धात्रुनाम संवत्सर, आषाढ शुध्द त्रयोदशी, गुरूवासर (दि.२ जुलै, १६९६) रोजी इनामाच्या तीन सनदा दिल्या, त्या सनदांचा आशय पुढीलप्रमाणे,

पहिल्या सनदेनुसार का। रहिमतपूर प्रांत वाई येथील चार चावर जमीन इनाम म्हणून दिली होती. या सनदेचा मजकूर पुढीलप्रमाणे, '......म्हणोन विदीत केले. त्याजवरून याजवरी स्वामी कृपाळू होऊन यास नुतन इनाम कसबा रहिमतपूर प्रांत मजकूर पैकी जीरात चावर ४ च्यार चावर सार कुलबाब कुल कानु देखील हालीपटी पेस्तर पटी खेरीज हकदार करून इनाम दिल्हा असे......'.[६६] ही दिलेली जमीन त्यांना वंशपरंपरेने कायमस्वरूपी दिली होती. त्यासाठी दरवर्षी वेगळया पत्राची अपेक्षा करू नये तसेच या जमिनीचा वंशपरंपरेने उपभोग घेण्याचा अधिकार दिला होता. हे सनदेतील पुढील आशयावरून दिसून येते, '......याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवणे. प्रतीवर्षी नुतन पत्राची अपेक्षा न करणे.........'.[६७]

दुसऱ्या सनदेनुसार मौजे नाटणे तर्फ सातारा येथील दोन चावर जमीन इनाम म्हणून दिली होती. त्या सनदेचा मजकूर पुढीलप्रमाणे, '.......स्वामी याजवरी कृपाळू होऊन यासी नूतन इनाम मौजे नाटणे ताा सातारा प्राा मजकूर पैकी जिरात चावर २ दोनी रास कुलबाब कुलकानु देखील हाली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार करून इनाम दिल्हे असे......'.[६८] ही दिलेली जमीन त्यांना वंशपरंपरेने कायमस्वरूपी दिली होती. त्यासाठी दरवर्षी वेगळया पत्राची अपेक्षा करू नये तसेच या जमिनीचा वंशपरंपरेने उपभोग घेण्याचा अधिकार दिला होता. हे सनदेतील पुढील मजकुरावरून दिसून येते, '......याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवणे. प्रतीवर्षी नुतन पत्राची अपेक्षा न करणे......'.[६९]

पाटण महालातील जकातीचे हक्क सरदार पाटणकर यांना मिळावेत यासाठी खुद्द सरदार चांदजीराव पाटणकर यांनी जिंजी मुक्कामी गेले असताना छत्रपती राजाराम महाराजांकडे याची मागणी केली. तेव्हा सरदार चांदजीराव पाटणकर यांची स्वराज्याप्रती असणारी निष्ठा तसेच त्यांनी वेळोवेळी केलेला पराक्रम, शत्रूंशी लढताना दाखविलेले शौर्य हा सगळा वृतांत लक्षात घेता छत्रपती राजाराम महाराज यांना सरदार पाटणकर यांना पाटण महालातील जकातींचे हक्क तिसऱ्या सनदेनुसार बहाल केले. या सनदेच्या मजकूर पुढीलप्रमाणे, '......तुम्ही स्वामीचे वतनी सेवक अंत:कर्णापूर्वक स्वामी सेवा करीत आहा.....'.[७०] म्हणजेच सरदार पाटणकर हे तत्कालिन मराठा स्वराज्यातील स्वामीनिष्ठ, स्वराज्यनिष्ठ वतनदार होते, हे दिसून येते. छत्रपती राजाराम महाराज यांनी या सनदेत पुढे असे म्हटले आहे की, '.......तुम्हास नूतन ईनाम पाा पाटण माहाली उभा मार्ग जकाती आहे. खेरीज हाकदार ते करून तुम्हास ईनाम आजरामरामत करून दिल्हा आसे. तुम्ही आपले स्वांधीन करून घेऊन जकातीची कामावीस करून हासील जो येईल तो तुम्ही तुमचे पुत्र पौत्रादी वौंशपरंपरेन अनुभऊन सुखी आसणे......'.[७१]

पाटण महाल हा घाटमाथ्यावरील एक महत्त्वाचा महाल होता. घाटमाथा व कोकण यादरम्यान होणारी वाहतूक, मालाची ने–आण ही पाटण महालातून होत होती. त्यामुळे या मार्गावर जकात वसूल करण्याचे अधिकार आपणांस दयावे, ही मागणी सरदार पाटणकरांनी छत्रपतींकडे केली असता त्यांची मागणी मान्य करण्यात आलेली दिसून येते. अशाप्रकारे पाटण महालातून जाणाऱ्या या मार्गावर सरदार पाटणकर यांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजी किल्ला इ.स. १६९० सालापासून इ.स. १६९७ सालाअखेर जवळजवळ ८ वर्षे मोठया हिंमतीने व पराक्रमाने लढविला. मोगल सैन्य ८ वर्षे जिंजी किल्ल्याला वेढा घालून बसले होते. शेवटी मोगल सैन्याने हा किल्ला काबीज केला परंतु तत्पूर्वीच छत्रपती राजाराम महाराज आपल्या कुटुंबकबिल्यासह किल्ल्यातून निसटून बाहेर पडले होते.[७२] जास्त वेळ एखादया किल्ल्यावर अडकून न पडता अंतस्थ सोयीचे राजकारण करून जेवढा वेळ शक्य आहे, तितका प्रतिकार करणे आणि गुप्तपणे जीविताची हमी घेऊन, शत्रूस गाफिल ठेवून तेथून सुखरूप निसटून जाणे. हा चाणाक्षपणा छत्रपती राजाराम महाराजांनी अवंलबिलेला दिसून येतो. जिंजीवरून ते वेल्लोर किल्ल्यावर आले नंतर फेब्रुवारी, १६९८ मध्ये ते स्वराज्यातील पन्हाळगडावर आले.[७३]

सरदार चांदजीराव पाटणकर यांच्या कार्यावर खुद्द छत्रपती किती खुश होते. हे आपल्याला पुढील पत्रावरून दिसून येते. इ.स. १७०० पूर्वीचे एक पत्र उपलब्ध आहे. सदर पत्र राजमान्य निलकंठ मोरेश्वर प्रधान यांनी लिहिले असून ते या पत्रात असे म्हणतात की, ‘.......त्यावरून कळो येईल त्या प्रांते तुम्ही राजश्रीच्या पायासी रूजू राहोनू साहेबकामे बहुत केली. त्यावरून तुम्हीवरी संतोषी आहेत. राजश्रीची कृपा बहुत तुमचे ठाई आहे तुम्ही तैसेच एकनिष्ठतेने राहणी केली राजश्री तुमचे

बरे करीतील याहून बहुताप्रकारे चालवितील तुम्ही समाधान असो दिल्हे पाहिजे.......'.[७४] निलकंठ मोरेश्वर यांच्या या पत्राच्या आशयावरून सरदार पाटणकर हे छत्रपतींचे एकनिष्ठ सेवक होते. छत्रपतींनी सोपविलेली कामगिरी त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली होती. त्यामुळे प्रधान निळकंठ मोरोपंत यांनी सरदार पाटणकर यांना पत्र पाठवून त्यांच्या कार्याबद्दल कौतुक केले होते. हे पत्र म्हणजेच सरदार पाटणकरांच्या एकनिष्ठतेची पोहोच पावतीच होते, असे दिसून येते.

पुढे प्रधान निळकंठ मोरेश्वर असे म्हणतात की, '......त्या प्रांते राजश्री रामचंद्रपंत अमात्य आहेत. त्यास हरयेक विसी लिहोनू पाठवीत जाणे. ते तुमच्या कार्यास अंतर करणार नाहीत.........'.[७५] म्हणजेच राजश्री रामचंद्रपंत अमात्यांच्या आदेशाने वाटचाल करावी. तसेच आपले कार्य व आपणाकडून घडून येणाऱ्या घडामोडीचा वृत्तांत हा वेळोवेळी राजश्री अमात्यांना देण्यात यावा. पुढे असे म्हणतात, '......तुम्ही भले लोक थोर आहा तुमचे बहुता रिती चालवितील कलले पाहिजे. बहुत लिहिणे न लगे कृपा असो दिजे.......'.[७६] तत्कालिन परिस्थितीमध्ये चौकस राहून काम करावे तसेच सरदार पाटणकरांवर विश्वास व्यक्त केलेला दिसून येतो. याचबरोबर सरदार पाटणकरांना स्वराज्यकामासाठी प्रोत्साहित केलेले दिसून येते.

छत्रपती राजाराम महाराज कर्नाटकातून स्वराज्यात आल्यावर मोगल बादशहा औरंगजेब याने इ.स. १६९९ मध्ये मराठयांचे किल्ले जिंकून घेण्यासाठी स्वतः मोहिम हाती घेतली होती. याचा अर्थ असा होतो की, मोगल बादशहाला त्याच्या सरदारांवर विश्वास राहिला नव्हता. त्यामुळे त्याने स्वतःच मोहिमेचे अधिपत्य स्वीकारून पहिल्या प्रयत्नातच मराठयांचा वसंतगड किल्ला जिंकून घेतला होता.[७७] हा किल्ला जिंकल्यावर त्याने मराठयांची नूतन राजधानी सातारा किल्ल्यास वेढा घातला होता.[७८]

स्वराज्यात आल्यावर छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या फौजांचे संयोजन करून बादशाही फौजांबरोबर सतत लढाया केल्याचे दिसून येते. ते एकसारखे या किल्ल्याहून त्या किल्ल्यावर फिरत राहिले. शेवटी मोगलांच्या मुलखात स्वारी काढण्याच्या उद्‌देशाने ते जालन्याच्या मोहिमेवर असतानाच त्यांच्या प्रकृतीने त्यांना दगा दिला आणि मोहिम अर्ध्यावर टाकून त्यांना सिंहगडावर परतावे लागले.[७९] तिथेच त्यांना वयाच्या अवघ्या ३०व्या वर्षी दिनांक ३ मार्च, १७०० रोजी निधन झाले.[८०] छत्रपती राजामराम महाराजांच्या मृत्यूनंतर राजश्री संताजी घोरपडे, राजश्री धनाजी जाधव, सरदार चांदजीराव पाटणकर व इतर मराठा सरदारांनी आपल्या असामान्य पराक्रमाच्या जोरावर मोगलांचा ठिकठिकाणी पराभव केला.

मराठा राज्य छत्रपतींच्या निधनाने आपण सहज जिंकू शकू, हे मोगल बादशहाचे स्वप्न सरदार पाटणकर आणि इतर मराठा सरदारांनी दाखविलेल्या पराक्रमामुळे धुळीस मिळविलेले दिसून येते. जिथे संधी मिळेल तिथे सरदार पाटणकर व इतर मराठा सरदारांनी मोगली सैन्याला परास्त केले व मोगलांच्या ताब्यातील किल्ले जिंकून घेतले. सरदार चांदजीराव पाटणकरांनी कर्नाटकांतील दादोरी हा किल्ला मोगलांकडून स्वराज्यात सामील करून घेतला.[८१] सर्वत्र मोगल सैन्याचा पराभव होत होता. खुद औरंगजेब हतबल झाला होता. मराठे त्वेषाने मोगलांवर तुटून पडत होते. प्रत्येक ठिकाणी मोगली सैन्याला माघार घ्यावी लागत होती. छत्रपती राजाराम महाराजांच्या अकाली निधनाने परत मराठा साम्राज्यामध्ये एक पोकळी निर्माण झाली.

छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर मोगली सैन्यामध्ये उत्साह संचारला होता. मोगलांनी साताऱ्याच्या किल्ल्यावर जोमाने हल्ले चढविण्यास सुरूवात केली होती. पण महाराणी ताराबाईसाहेबांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी मोगलांच्या हल्ल्यांना दाद दिली नाही. महाराणी ताराबाईसाहेबांनी केवळ राज्याचा मुलकी कारभारच केला असे नाही, तर त्यांनी

मराठी लष्करांचे नेतृत्व आणि लष्करी मोहिमांचे संयोजन केले. त्यांच्या कारकिर्दीत मराठे मोगली सैन्याशी स्वराज्यात लढत राहिलेच. शिवाय मराठयांनी महाराष्ट्राच्या बाहेर हा संघर्ष नेला. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठी फौजा गुजरात, माळवा, तेलगंण आणि कर्नाटक अशा विस्तृत प्रदेशांत घुसविल्या.[८२] परिणामी बादशहाचे दक्षिणेतील साम्राज्य तर नष्ट झालेच, पण उत्तरेतील साम्राज्याला धक्का पोहोचला.

मराठयांवर हल्ले करून किल्ला हाती येत नाही, हे पाहिल्यावर औरंगजेब बादशहाने मराठयांबरोबर वाटाघाटीचा मार्ग स्वीकारला. त्याने आपला सरदार रूहुल्लाखान याच्यामार्फत राजश्री विठोजी पाटील या मध्यस्थास महाराणी ताराबाईसाहेबांचा प्रधान परशुराम ज्यंबक प्रतिनिधी याजकडे पाठविले. या पार्श्वभूमीवर सरदार चांदजीराव पाटणकर यांना राजश्री परशुराम ज्यंबक यांनी सुहूर सन मया व अलफ, छ ५ जिलकाद, (दिनांक १४ एप्रिल, १७००) रोजी एक महत्त्वाचे पत्र पाठविले. या पत्रातून सातारा किल्ल्यातील परिस्थिती, सज्जनगडावर कमरदीखानचा पडलेला वेढा यावर भाष्य करण्यात आले आहे.

या पत्रामध्ये राजमान्य परशुराम त्र्यंबक म्हणतात की, '.....गनिमाचे कहीकाबाड मारीतो म्हणऊनु लिहिले ते कलो आले समाधान वाटले......'.[८३] म्हणजेच तुम्ही गनिमांचे नुकसान करता, त्यांना वाताहत करतात हे तुम्ही पाठविलेल्या पत्रामुळे समजते. तसेच हे वाचून आनंद झाला. या पत्रात पुढे परशुराम ज्यंबक असे म्हणतात की, '.......याउपरीहि त्या प्रांते गनिमाची कही येईल ते घेत जाणे तुम्हापासी जमावहि पोखता आहे जमावाचे पोटहि भरेल स्वामी कार्यहि होईल.....'.[८४] गनिमावर हल्ला करताना जे मिळेल ते घेत जाणे कारण तुमच्याकडे जमावही मोठा आहे. तसेच या जमावाचे सर्व काही तुम्हांलाच बघायचे आहे. त्यांच्या खाण्यापिण्याची तसेच जनावरांच्या दाणापाण्यांची तुम्हालाच सोय करावयाची आहे. त्यामुळे गनिमाकडून

मिळालेल्या लुटीतून तुम्ही हे करत जाणे. त्यामुळे तुमच्या सैन्याची सोय ही होईल आणि स्वामी कार्य ही तुमच्या हातून घडून येईल. म्हणजेच सरदार पाटणकरांकडील सैन्यसंख्येमुळे त्यांची ताकद वाढली होती. तसेच एक बलाढय सरदार म्हणून त्यांचे कार्याचे महत्त्व अधोरेखित होते.

औरंगजेबाच्या या सातारा वेढयाने मराठयांचे मोठे नुकसान झाले. परंतु चिवटपणे त्यांनी मोगलांना प्रतिकार करणे चालूच ठेवले. सरदार पाटणकर व इतर मराठा सरदारांनी मोगल सैन्य पुरते नामोहरण केले. त्यामुळे खुद बादशहाला मराठयांशी वाटाघाटी करण्याची गरज भासलेली दिसून येते. यातून औरंगजेब बादशहाने रोहिलाखानास हुकूम करून बोलणी करण्यासाठी राजश्री विठोजी पाटील यास राजश्री परशुराम प्रधान यांचेकडे पाठविले. तसेच राजश्री परशुराम प्रधान यांनी राजश्री अंताजी आपदेव यांस बादशहाच्या भेटीस पुढील बोलणी करण्यासाठी पाठविले.

या पत्रातील वृत्तांत पुढीलप्रमाणे, '......इकडील वर्तमान तर औरंगजेबाने अजीपावेतो सातारेयास जो ईलाज करावयाचा तो केला परंतु काहीच न चाले या करीता हाली सद्य प्रसंगाचे राजकारण लावणे म्हणऊनू रोहिलाखानास हुकूम करून त्याचे तर्फेने राजश्री विठोजी पाटील आमचे भेटीस पाठविले. पातशहांचा आदर देखोन आम्ही राजश्री अंताजी आपदेव यास पातशहाचे भेटीस पाठविले आहेत. त्यांची भेटी होउनू पुढे जो प्रसंग होउनू येईल तो तुम्हास लिहून पाठऊन देऊ........'.[८५] म्हणजेच सरदार पाटणकरांचे तत्कालिन वेढयासंबंधी कर्तृत्व आपणांस पहावयास मिळते. त्यांच्या पराक्रमामुळेच सातारा किल्ला मोगलांना जिंकता आला नाही. तसेच खुद्द मराठा राज्याचे प्रधान त्यांना प्रत्येक वाटाघटीबाबत त्यांच्याशी सल्लामसलत करताना दिसून येतात. यावरून सरदार पाटणकरांनी मराठा राज्यातील निर्माण केलेले प्रस्थ दिसून येते.

शेवटी या पत्रामध्ये राजमान्य परशुराम प्रधान असे लिहितात की, '.......प्रस्तुत सज्जनगडाखाले कमरदीखान आला याचे कहीस बरी दहशत लाउन कही मारीत जाणे आणि वर्तमान वरचेवर लिहीज जाणे. मालोजी व अरजोजी पवार जमावानसी हमी राहिले आहेत पंचवीस स्वार त्या पासी आहेत ते देवावे म्हणउनू लिहिले त्यावरून त्यांस पत्र दिल्हे असे त्याला जमावानसी आपणाजवळ आणून ठेवणे.......'.[८६] या पत्राच्या शेवटच्या उताऱ्यावरून असे दिसते की सरदार चांदजीराव पाटणकर यांचे महत्त्व मराठा स्वराज्यामध्ये किती होते. औरंगजेब बादशहाशी बोलणी झालेवर काही निर्णय होईल हा तुम्हाला कळविला जाईल. म्हणजेच छत्रपती दरबारी असणारी त्यांची पत आपल्याला दिसून येते. तुम्ही आपल्या जमावानिशी सज्जनगडाकडे रवाना व्हा. तेथे कमरदीखान याने वेढा दिलेला आहे. त्याचा बिमोड करता आला तर बघा. तसेच मोगली सैन्यामध्ये दहशत निर्माण करणे. त्याचबरोबर तुमची खुशाली वरचेवर कळवित जाणे. मालोजी व अरजोजी पवार यांच्याकडील पंचवीस स्वार तुम्हाला दिले आहेत. त्यांना तुमच्याजवळ ठेवणे.

छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांचे पुत्र शिवाजी महाराज दुसरे हे गादीवर आले. त्यांनी सरदार चांदजीराव पाटणकर यांचे पुत्र रामराव पाटणकर, सुभानराव पाटणकर यांचे स्वराज्यातील स्थान ओळखून त्यांना अंतर्गत त्रास देणाऱ्या कसबा पाटण येथील पाटीलकी वतन असणाऱ्या पाटील टोळे यांना ताकीद दिली. तसेच याबाबत राजश्री परशुराम प्रतिनिधी यांनी चौकशी करावयाचे आदेश दिले. हे आपणांस छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी श्री राज्याभिषेक शक ३१, तारण नाम संवत्सर, मार्गशीर्ष बहुल दशमी, रविवासर (दिनांक १० डिसेंबर, १७०४) रोजी पाठविलेल्या पत्रातून कळून येते. या पत्रात समस्त टोळे पाटील यांना ताकीद दिलेली दिसून येते. या पत्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज दुसरे असे म्हणतात, '......स्वामीनी पारपत्य करावया आज्ञा केली पाहिजे म्हणून विदीत केले तरी तुम्ही वतनदार होऊन तुम्हास अैसी लबाडी करावया गरज काये हाली हे

चवकसीने मनास आणावयाविशी राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यास आज्ञा केली आहे. तरी तुम्ही देखत आज्ञापत्र पंडित मशारनुइलेकडे जाणे ते तुमचे वर्तमान चवकसीने मनास आणून खरेखुरे होईल.......'.[८७] म्हणजेच स्वराज्याच्या सेवेस असणाऱ्या सरदारांस काही वतनदार मंडळी त्रास देत असतील तर ते चुकीचे आहे लबाडीचे आहे, असे ठणकावून सांगताच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश राजश्री परशुराम पंडित प्रतिनिधी यांना देतात. या पत्राद्वारे आपणांस असे दिसून येते की, छत्रपती घराणे आणि सरदार पाटणकर घराणे यांच्यातील संबंध किती दृढ होते. तसेच प्रत्येक छोटया छोटया घटनांमध्ये छत्रपती नेहमीच सरदार पाटणकर यांच्या मागे ठामपणे उभे राहिलेले दिसून येतात.

**सारांश:**

उपलब्ध माहितीच्या आधारे हे स्पष्ट होते की, शिवपूर्वकाळात, शिवकालाच्या अंदाजे १०० वर्षे अगोदर या क्षत्रिय घराण्याच्या चालुक्य ऊर्फ साळुंखे कुळांनी व त्यांच्या घराण्यातील पराक्रमी व्यक्तींनी स्वराज्य उभारणीच्या जडणघडणीच्या काळात व भविष्यात होणाऱ्या स्वराज्य पायाभरणीच्या पवित्र कार्यात आपले अपूर्व योगदान दिले. शिवछत्रपतींच्या पूर्वजांना महत् सहकार्य केले. शिवपूर्वकाळात या घराण्याने केलेले कर्तृत्व आपणांस निदर्शनास येते. सरदार पाटणकर घराण्याने स्वराज्य निर्मितीत मोठे योगदान दिले होते. छत्रपती शिवाजी महाराजांना कठीण प्रसंगी सरदार पाटणकरांनी लष्करी सेवा देऊन स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी सहकार्य केलेले होते. प्रबळ शत्रुसैन्याविरूध्द लढताना गनिमी कावा युध्दतंत्राचा यशस्वी वापर केला होता.

सरदार पाटणकरांनी स्वराज्य रक्षणासाठी व त्याचा विस्तारासाठी तलवार चालवून, प्रसंगी रक्त सांडून तर वेळप्रसंगी मुत्सद्देगिरीचा वापर केला होता. सरदार पाटणकर यांनी स्वराज्यांतर्गत गडकोट किल्ल्यांचे व

मराठी रियासतीचे बलाढय शत्रूंपासून रक्षण केले होते. दक्षिण मोहिमेवर धारातीर्थी पडलेल्या राजश्री यशवंतराव पाटणकर यांना पंचकुलीन क्षत्रिय परगणेदार म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी गौरविलेले पहावयास मिळते. सरदार पाटणकर कुंटुंबियांना उद्देशून दिनांक २४ जानेवारी, १६७८च्या लिहिलेल्या सांत्वनपर पत्रात घराण्याचे वतन, जित्राब, घोडी अबाधित ठेवून स्वराज्यसेवेसाठी वीरमरण आलेल्या कुलवंत क्षत्रिय यशवंतराव पाटणकर यांचा उचित गौरव केलेला दिसून येतो.

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात राजश्री नागोजीराव, चांदजीराव, रामराव व पदाजीराव या पाटणकर घराण्यातील वीर पुरूषांनी कर्तबगारी दाखविलेली दिसून येते. पाटण परगण्याचे हवालदार रामाजी अनंत यांना व्याघ्रगड प्रांताचे सुभेदार त्रिंबक कृष्ण सभासद यांनी लिहिलेले दिनांक ९ जून, १६९०चे पत्र सरदार पाटणकर घराण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. राजश्री नागोजीराव पाटणकर व राजश्री चांदजीराव पाटणकर या पितापुत्रांनी छत्रपती महाराजांशी इमानेइतबारे एकनिष्ठा धरली म्हणून महाराजांनी त्यांना सेनेची पंचसहस्त्री दिल्याचे या पत्रात म्हटले आहे. राजश्री नागोजीराव व राजश्री चांदजीराव पाटणकर यांच्याबरोबर राजश्री रामराव व राजश्री पदाजीराव पाटणकर यांनी वेळोवेळी छत्रपतींची सेवा इनामेतबारे केल्याचे दिसून येते. राजश्री रामराव व पदाजीराव पाटणकर यांना पागेची पंचसहस्त्री द्यावी अशी शिफारस त्यावेळी राजश्री चांदजीरावांनी छत्रपतींना केली. छत्रपतींनी ती मान्य करून रामरावांना पागेची पंचसहस्त्री व पदाजीराव पाटणकर यांना सालिना २००० पातशाही होनाच्या सरंजामासह पागेची पंचसहस्त्री दिली. छत्रपती आणि सरदार पाटणकर यांच्यातील संबंध अतिशय दृढ होते, हे आपणांस दिसून येते.

सरदार पाटणकर यांनी छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे केलेल्या वेगवेगळया मागण्या छत्रपतींनी मान्य केलेल्या दिसून येतात. जरी हे लोभाचे, स्वार्थाचे वाटत असले तरी सरदार पाटणकरांनी केलेल्या

स्वामीनिष्ठेचे, स्वराज्यनिष्ठेचे ते फलितच आहे, असे आपणांस दिसून येते. तसेच कोणतेही सैन्य हे पोटावर चालते. एवढे मोठे सैन्य बाळगणे, त्यांच्या पोटापाण्यासाठी तसेच त्यांच्याजवळील प्राण्यांच्या दाणापाण्याची सोय व्हावी, यासाठी सरदार पाटणकरांना वेळोवेळी छत्रपतींकडे मागण्या केलेल्या दिसून येतात आणि छत्रपतींनीही त्या मागण्या मान्य केल्याचे आपणांस पहावयास मिळते.

जिंजी मोहिमेत राजश्री संताजी घोरपडे आणि राजश्री धनाजी जाधव या पराक्रमी उभयतांबरोबर ससैन्य उपस्थित राहून राजश्री चांदजीराव पाटणकर यांनी आपले योगदान दिलेले दिसून येते. त्यांच्या या कामगिरीची नोंद घेऊन खुद्द छत्रपती राजाराम महाराजांनी दिनांक १४ फेब्रुवारी, १६९३ला पाटण परगण्यातील १२ गावांच्या पूर्वीच्या इनामासह साऱ्या पाटण परगण्याच्या इनामाची ताम्रपत्रावरील सनद चांदजीराव पाटणकर यांना बहाल केलेली पहावयास मिळते. इ.स. १६८९ ते इ.स. १६९६ हा काळ खऱ्या अर्थाने सरदार पाटणकर घराण्याच्या दृष्टीने सर्वोच्च उत्कर्षाचा व प्रगतीचा सुवर्णकाळ होता. या काळात खास मानसन्मान, पदव्या, वतनी गावे, जहागिऱ्या, पंचहजारी घोडेस्वारांचा सरंजाम, राजाच्या पिलखान्यातील ऐटदार हत्ती, पाटण महालातील जकातीचे हक्क यासारखे व अन्य अधिकार छत्रपती राजाराम महाराज यांनी सरदार पाटणकरांना सनदेद्वारे दिलेले दिसून येतात.

छत्रपती राजाराम महाराजांच्या अकाली निधनाने मराठयांचे अपरिमित नुकसान झाले. मोगली सैन्याने साताऱ्याच्या किल्ल्यावर जोमाने हल्ले चढविण्यास सुरूवात केली होती. पण महाराणी ताराबाईसाहेबांच्या नेतृत्वाखाली सरदार पाटणकरांनी व इतर मराठा सरदारांनी मोगलांच्या हल्ल्यांना दाद दिली नाही. किल्ला ताब्यात येत नाही म्हणून औरंगजेब बादशहाने वाटाघाटीचा मार्ग स्वीकारलेला दिसून येतो. सरदार रूहुल्लाखान याच्यामार्फत राजश्री विठोजी पाटील या मध्यस्थास महाराणी ताराबाईसाहेबांचा प्रधान परशुराम

त्र्यंबक प्रतिनिधी यांचेकडे पाठविले. या पार्श्वभूमीवर राजश्री चांदजीराव पाटणकर यांना राजश्री परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांनी दिनांक १४ एप्रिल, १७०० रोजी एक पत्र पाठविलेले दिसून येते. या पत्राद्वारे साताऱ्यास वेढा घालून बसलेल्या मोगली सैन्याच्या रसदी मारण्याची कामगिरी महाराणी ताराबाईसाहेबांनी राजश्री चांदजीराव पाटणकर यांचेवर सोपविली आणि त्यांना मोगली सैन्यावर दहशत बसविण्यात सांगितले होते.

थोडक्यात शिवकाळात सरदार पाटणकर घराण्याने वेळोवेळी आपल्या शौर्याच्या जोरावर अनेक मानसन्मान, जहागिऱ्या, सनदा मिळविल्या. छत्रपतीकडून मिळणाऱ्या कौतुकाच्या थापेमुळे या घराण्याचे क्षात्रतेज अधिक वाढत गेलेले दिसून येते. वेळोवेळी छत्रपतींनी दाखविलेला विश्वास त्यांनी आपल्या कर्तृतवाच्या जोरावर सार्थ केलेला दिसून येतो. शिवशाहीतील पाटणकर घराण्याच्या कागदपत्रांवरून काही निष्कर्ष निघतात, ते म्हणजे,

१. शिवछत्रपतींच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यात महाराष्ट्रातील ज्या काही वतनदार देशमुखांनी सहकार्य दिले, त्यापैकी साताऱ्याच्या प्रदेशातील पाटणकर देशमुख प्रमुख होते.
२. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर स्वराज्यात निर्माण झालेल्या अभूतपूर्व संकटप्रसंगात पाटणकर छत्रपतींशी व स्वराज्याशी एकनिष्ठ राहिले. सरदार पाटणकर घराण्यातील एकही पुरूष वतनाच्या वा सरंजामाच्या आशेने वा स्वार्थाने मोगलांना मिळालेला नाही, हे या घराण्याचे नमूद करण्यासारखे वैशिष्टये आहे.
३. छत्रपती राजाराम महाराज कर्नाटकात गेल्यावर ‘ना राज्य—ना राजा’ अशी परिस्थिती महाराष्ट्रात जेव्हा निर्माण झाली, त्यावेळी ज्या मराठा सरदारांनी स्वराज्यनिष्ठेने जिद्दीने फौजा उभ्या करून मोगली फौजांशी संघर्ष केला, त्यामध्ये सरदार पाटणकर प्रमुख आहेत.

४. प्रसंगी सावकारांकडून कर्जे घेऊन त्यांनी सैन्य उभे केले व त्या सैन्याच्या बळावर अनेक मोगल सरदार बुडविले, ही गोष्ट कौतुकास्पद आहे.

शिवशाहीत, विशेषत: मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दाच्या कालखंडात या सरदार पाटणकर घराण्याने केलेल्या अतुलनीय कामगिरीची माहिती मिळते. यशवंतराव, नागोजीराव, चांदजीराव, रामराव आणि पदाजीराव असे पराक्रमी पुरूष सरदार पाटणकर घराण्यांने स्वराज्याला दिले आहेत.

## -: टीपा व संदर्भ :-


१) प्रा.डी.डी.चव्हाण, *'क्षत्रिय कुलावतंस चालुक्य–सोळंखी–साळुंखे ऊर्फ श्रीमंत सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास'*, श्रीराम प्रकाशन, पाटण, सुधारित द्वितीय आवृत्ती, ८ एप्रिल, २०१४, पान नं. ८.

२) कित्ता, पान नं. ८.

३) कित्ता, पान नं. १०७.

४) कित्ता, पान नं. १०८.

५) कित्ता, पान नं. १०८.

६) सुनिल द. दापुरकर (संपा.), *'श्रीमंत सरदार पाटणकर हुजुरवाडेकर (चाालुक्य ऊर्फ साळुंखे) क्षत्रिय कुळाचा इतिहास व ऐतिहासिक कागदपत्रे'*, गगनगिरी प्रकाशन, गगनगिरी, प्रथमावृत्ती, २००३, पान नं. ८.

७) व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *' शिवकालीन कागदपत्रे (Records of the Shivaji Period) विभाग–३, पाटण येथील सरदार पाटणकर घराण्याची कागदपत्रे',* पुराभिलेख विभाग, मुंबई, पान नं. १७३.

८) कित्ता, पान नं. १७३.

९) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ४०.

१०) कित्ता, पान नं. ४०.

११) कित्ता, पान नं. ४०.

१२) कित्ता, पान नं. ४०.

१३) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. ११५.

१४) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का',* पान नं. १७७, १७८.

१५) कित्ता, पान नं. १७४, १७५.

१६) कित्ता, पान नं. १७४, १७५.

१७) कित्ता, पान नं. १७४, १७५.

१८) कित्ता, पान नं. १७४, १७५.

१९) कित्ता, पान नं. १७४, १७५.

२०) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ४१.

२१) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का'*, पान नं. १७६.

२२) कित्ता, पान नं. १७६.

२३) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ४२.

२४) कित्ता, पान नं. ४२.

२५) कित्ता, पान नं. ४३.

२६) कित्ता, पान नं. ४३.

२७) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का'*, पान नं. १७९ ते १८०.

२८) कित्ता, पान नं. १७९ ते १८०.

२९) कित्ता, पान नं. १७९ ते १८०.

३०) कित्ता, पान नं. १७९ ते १८०.

३१) कित्ता, पान नं. १७९ ते १८०.

३२) कित्ता, पान नं. १७९ ते १८०.

३३) इनाम कमिशन रू.क्र. ३५० (अ), शराकती दुमालदार रेकॉर्ड, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

३४) कित्ता.

३५) कित्ता.

३६) कित्ता.

३७) कित्ता.

३८) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. १३.

३९) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का'*, पान नं. १८१.

४०) कित्ता, पान नं. १९८.

४१) कित्ता, पान नं. १८२.

४२) कित्ता, पान नं. १८२.

४३) कित्ता, पान नं. १८३.

४४) कित्ता, पान नं. १८३.

४५) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ४५.

४६) कित्ता, पान नं. ४६.

४७) कित्ता, पान नं. ४६.

४८) कित्ता, पान नं. ४६.

४९) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का',* पान नं. १८४.

५०) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ४६.

५१) कित्ता, पान नं. ४६.

५२) इनाम कमिशन रू.क्र. ३५० (अ), शराकती दुमालदार रेकॉर्ड, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

५३) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. ११६.

५४) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का',* पान नं. १८५—१८६.

५५) कित्ता, पान नं. १८५—१८६.

५६) कित्ता, पान नं. १८५—१८६.

५७) रू.क्र.१, पु.क्र.१, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

५८) कित्ता.

५९) कित्ता.

६०) कित्ता.

६१) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ४८.

६२) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का',* पान नं. १८७.

६३) कित्ता, पान नं. १८७.

६४) कित्ता, पान नं. १८८—१९०.

६५) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का',* पान नं. १९१.

६६) कित्ता, पान नं. १९२.

६७) कित्ता, पान नं. १९२.

६८) कित्ता, पान नं. १९३.

६९) कित्ता, पान नं. १९३.

७०) कित्ता, पान नं. १९४.

७१) कित्ता, पान नं. १९४.

७२) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का,* पान नं. ४९.

७३) कित्ता, पान नं. ४९.

७४) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. ४२३.

७५) कित्ता, पान नं. ४२३.

७६) कित्ता, पान नं. ४२३.

७७) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का,* पान नं. ५०.

७८) कित्ता, पान नं. ५०.

७९) कित्ता, पान नं. ४९.

८०) कित्ता, पान नं. ४९.

८१) कित्ता, पान नं. ४९.

८२) कित्ता, पान नं. ४९.

८३) पूर्वोक्त, व्ही.जी.खोबरेकर (संपा.), *'शि.का.वि.३,पा.ये.स.पा.घ.का',* पान नं. १९६—१९७.

८४) कित्ता, पान नं. १९६—१९७.

८५) कित्ता, पान नं. १९६—१९७.

८६) कित्ता, पान नं. १९६—१९७.

८७) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. ४२५.